

ISSN 2279-0462

# रानवेध

## स्थापना दिवस विशेषांक

वर्ष : ६ वे
अंक :१ व २
ऑक्टोंबर २०१९

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती




वेक्स बर्ड-फेस्ट चे यशस्वी आयोजक केल्यानंतर एकत्रित चमु



अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या सोबत
वेक्सचे सदस्य पक्षी निरिक्षण करतांना




वेक्स कडुन ११ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलनाचे यशस्वी आयोजन




जागतिक चिमणी दिनाचे यशस्वी आयोजन
(एक घर एक घरटे अभियान)



वेक्स कडुन विद्यार्थ्यांकरिता पक्षीनिरीक्षणाचे आयोजन




शासकिय विदर्भ महाविद्यालयातील होम सायन्स विभागात
प्लास्टीक प्रदुषणावरील कार्यशाळेचे आयोजन



शासकिय विदर्भ महाविद्यालयातील होम सायन्स विभाग आणि वेक्स यांच्या तर्फे
नैसगिक रंग कार्यशाळेचे आयोजन




नैसर्गिक रंग कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करतांना संस्थेच्या अध्यक्षा

# वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती

WILDLIFE AND ENVIRONMENT CONSERVATION SOCIETY, AMRAVATI.

रजि.नं. ८७/२००१/अम.


# रानवेध


ISSN 2279-0462

वर्ष : ७ वे अंक १ व २ ऑक्टोंबर २०१९



- **संपादक**

  डॉ. जयंत वडतकर
- **कार्यकारी संपादक**

  श्री. किरण मोरे

  सौ. प्राची पालकर
- **संपादक मंडळ**

  प्रा.डॉ. गजानन वाघ

  प्रा.डॉ. अंजली देशमुख

  प्रा.डॉ. मंजुषा वाठ प्रा.

  डॉ. श्रीकांत वऱ्हेकर
- **मुखपृष्ठ**

  श्री. प्रशांत तिरमारे



- **मुद्रक**

  श्री गुरुदेव प्रिन्टर्स

  शेगांव नाका, अमरावती.
- **प्रकाशक**

  सचिव

  वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती.

  पत्ता : ४२ ग्रिनपार्क कॉलनी, आशियाड जवळ,

  शेगांव रोड, अमरावती–४४४ ६०४

  Email : wecs_2001@yahoo.com /

  wecsamt.2001@gmail.com

  Website : www.wecsamravati.org



- खाजगी वितरणासाठी, लेखकांचे मत हे त्यांची वैयक्तिक विचारधारा आहे.

# वेक्स कार्यकारिणी



प्रा.डॉ. अंजली देशमुख
* अध्यक्ष *



डॉ. जयंत वडतकर
* सचिव *



प्रा.डॉ. गजानन वाघ
* कोषाध्यक्ष *



प्रा.डॉ. श्रीकांत व्हेकर
* उपाध्यक्ष *



प्रा. डॉ. मंजुषा वाठ
* सहसचिव *



सौ. प्राची पालकर
* सदस्य *



श्री. गजानन बापट
* सदस्य *



श्री. किरण मोरे
* सदस्य *



श्री. मिलिंद चिमोटे
माजी महापौर
* सल्लागार *



डॉ. राजु कसंबे
संस्थापक सचिव
* सल्लागार *



डॉ. प्रभा भोगावकर
संस्थापक अध्यक्ष
* सल्लागार *

# संपादकीय...

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेची स्थापना होऊन आज १९ वर्षे झालीत, अगदी सुरुवातीला १०-१२ जणांच्या गटापासून सुरु झालेल्या या संस्थेचा १९ वर्षाचा प्रवास बघून सुरुवातीपासून संस्थेसोबत असलेल्यांना यावर विश्वास सुद्धा बसणार नाही. या जवळपास दोन दशकाच्या प्रवासात संस्थेने अनेक कार्यक्रम राबविलेत, वेगवेगळे प्रकल्प पूर्ण केलेत आणि कार्यशाळा व विदर्भ व राज्यस्तरीय पक्षीमित्र संमेलनाचे सुद्धा यशस्वी आयोजन केले. नैसर्गिक रंगांचा प्रसार करण्याच्या हेतूने विविध स्पर्धा, कार्यशाळा व प्रदर्शनी चे व प्रदुषणमुक्त गणेश उत्सव इत्यादी आयोजन केले. वन्यजीव छायाचित्र प्रदर्शनी, पक्षीनिरीक्षण, निसर्गभ्रमण, किल्ले स्वच्छता हे कार्यक्रम तर नियमितच. या सर्व प्रवासात त्या त्या विषयामधे रूची असनारे अनेक लोक सहभागी झालेत, काही जन जुळलेत, काहींनी काही वर्षे संस्थेसोबत कार्य केले, यात महत्वाचे म्हणजे जे जुळलेत ते कायमचे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे प्रत्येकाने पर्यावरणाचा विचार सोबत नेला आणि आज जेथे असतील तेथे, जमेल त्या परीने पर्यावरणासाठी ते आपले योगदान देत असतात. हे सर्व लिहिण्याचे कारण असे की, यावर्षी पहिल्यांदाच संस्था आपला स्थापना दिवस साजरा करीत आहे, तेव्हा हा सर्व प्रवास आठवणे साहजिकच आहे. संस्थेतर्फे पर्यावरण व वन्यजीव क्षेत्रात, विदर्भातून उत्तम कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस पुरस्कार देऊन गौरवावे असे गेल्या दोन वर्षापासून ठरले होते परंतु काही ना काही कारणाने ती प्रक्रीया पूर्ण होऊ शकली नाही. यावर्षी मात्र त्याची सुरुवात झाली आणि वेक्स **'ग्रीन वॉरीअर'** हा यावर्षीचा पहिला पुरस्कार चंद्रपूर येथील श्री. बंडू धोतरे यांना जाहीर झाला. या पुरस्काराचे वितरण स्थापना दिवशी होत आहे.

संस्थेचा मातीचा गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा हे उपक्रम गेली १४ वर्षे सातत्याने सुरु असून यामध्ये दरवर्षी ५-६ महाविद्यालयातील ५०-६० विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून कार्य करतात त्यातील काही जन पुढे संस्थेच्या विविध उपक्रमात रुची घेऊन संस्थेशी जुळतात, या स्वयंसेवकांसाठी एक कार्यशाळा सुद्धा या स्थापना दिवसानिमित्त आयोजित केली आहे. या स्थापना दिवसानिमित्त प्रकाशित होत असलेल्या संस्थेच्या रानवेध या विशेषांकाचे प्रकाशन या निमित्याने होत आहे. पहिल्यांदाच संस्थेचा स्थापना दिवस साजरा होत असतांना या अंकात आजवर संस्थेने जे विविध उपक्रम राबविलेत, कार्यक्रम घेतलेत, त्या सर्वांचा आढावा या अंकात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यातून संस्थेच्या कामाची पद्धतशीरपणे नोंदणी होईल हा त्यामागील उद्देश. आपल्याला हा अंक वाचतांना संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती होईल व त्यातून भविष्यात आपणही या कार्यक्रमात सहभागी व्हावे व सहकार्य करावे ही अपेक्षा.

डॉ. जयंत वडतकर
संपादक

# अनुक्रमणिका

# रानवेध

## आतील पानात....


| | | |
|---|---|---|
| १) | वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या पहिल्या ग्रीन वॉरीयर पुरस्काराचे मानकरी | १ ते २ |
| २) | मातीचे गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा. | ३ ते ५ |
| ३) | पक्षी अभ्यास, नोंदणी व संशोधनातील संस्थेची वाटचाल | ६ ते ७ |
| ४) | निसर्गरंग वाचवतील निसर्ग | ८ ते १० |
| ५) | मेळघाटातील निसर्गभ्रमण | ११ ते १५ |
| ६) | पर्यावरण संवर्धन एक नैतिक जबाबदारी | १६ |
| ७) | पर्यावरण व वन्यजीव संवर्धनासाठी सामंजस्य करार | १७ ते १८ |
| ८) | माहितीपटाची निर्मीती (एका डॉक्युमेंटरीच्या निमित्याने) | १९ ते २० |
| ७) | माझ्या छायाचित्रणाचा प्रवास | २१ ते २२ |
| ८) | वाईल्ड लाईफ फोटोग्राफी आणि रोजगार | २३ ते २४ |
| ९) | पक्षिछायाचित्रण -तथ्य, आव्हाने आणि उपयोगीता | २५ ते २६ |
| १०) | वेक्स तर्फे पक्षी महोत्सवाचे आयोजन | २७ |
| ११) | जागतिक चिमणीदिनानिमित्य विविध कार्यक्रम | २८ |

## श्री. बंडू धोतरे

## वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या पहिल्या ग्रीन वॉरियर पुरस्काराचे मानकरी

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थे तर्फे पर्यावरण व वन्यजीव संवर्धन या कार्यात विदर्भातून विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तीस प्रति वर्षी ग्रीन वॉरियर पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. २०१९ हे या पुरस्काराचे प्रथम वर्ष असून यावर्षी हा पुरस्कार चंद्रपूर येथील ईको प्रो या संस्थेचे संस्थापक श्री. बंडु धोतरे यांना जाहीर झाला असून दिनांक २ ऑक्टोबर रोजी, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या स्थापना दिवसाच्या निमित्य होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या वर्षी हा पुरस्कार स्व. अभय अरविंद कानस्कर स्मृती प्रीत्यर्थ देण्यात येणार असून, पुरस्कार राशी रु. २५००/– मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ग्रीन वॉरियर पुरस्कार प्राप्त श्री. बंडू धोतरे यांचे कार्य सर्व परिचित असून ते गेल्या १५ वर्षापासून वन्यजीव संवर्धनासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या आंदोलनांनी विदर्भातील व्याघ्र संवर्धनाला नवीन आयाम मिळवून दिलेत. अदानी प्रकल्पाला विरोध करून ताडोबाचे बफर क्षेत्र वाचविण्यात त्यांना यश आले होते. अनेकदा अभिनव आंदोलने, वाघ, बिबट आणि अस्वल अशा प्राण्यांच्या रेस्क्यू मध्ये उल्लेखनीय कार्य व अलीकडे गड किल्ले संवर्धनासाठी केलेली महाराष्ट्र परिक्रमा व देशात कुठेही झाले नाही असे सतत ८०० दिवसापेक्षा जास्त दिवस श्रमदान करून ११ किमी चा चांदां किल्ला स्वच्छता अभियान यातून त्यांनी आपल्या कार्याची छाप पडली आहे .

### श्री. बंडू धोतरे यांचा परिचय



इथे प्रत्येक जन जनासाठी झटणारा सापडतो. मात्र मुक्या प्राण्यांच्या जीवांसाठी झटणारे दुर्मिळच...! हल्ली तरुणाई इकडे फिरकू लागली खरी पण त्यातल्या त्यात प्रामाणिक कार्य करणारे दुर्मिळच..! असे अवलिया अवतीभोवती आहेत चंद्रपूर जिल्हा तसाही वाघ व मानव संघर्ष आणि प्रदूषनाच्या दृष्टीने जगाच्या नकाशावर आलाय. अश्या काही गंभीर समस्यांची उत्तरे शोधण्याची धडपड एक तरुण इमाने इतबारे करतो हेही नवलच..! बाकीची तरुणाई प्रेमाची स्वप्ने रंगवीत असतांनाच, ऐन उमद्या वयात हा तरून वन व वन्यजीवांच्या प्रेमात पडतो. सळसळते रक्त सुसाट वेगाने धावत सुटते. वन्यजीव व पर्यावरण संवर्धनच नाहीतर ऐतिहासिक वारसाही जपण्याची इच्छा मनात घर करू लागते. निसर्ग थांबत नाही तसा तोही न थांबता अविरतपणे कार्य करीत राहतो. हा हरफणमौला तरुण आहे चंद्रपूरचा बंडू धोतरे...! त्यांना सन २०१३–१४ सालचा भारत सरकारचा 'राष्ट्रीय युवा पुरस्कार', २००६ चा चंद्रपूर पर्यावरण संवर्धन समितीचा 'पर्यावरण मित्र पुरस्कार' वनराई, विदर्भ विभाग, नागपूर चा वन्यजिव संवर्धन पुरस्कार–२०१० यासह एकूण १३ पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून यावरूनच त्यांच्या कार्याचा अंदाज घेता येऊ शकतो. याशिवाय त्यांच्या इको प्रो या संस्थेस सुद्धा अनेक पुरस्कार मिळाले असून त्यामध्ये राष्ट्रीय युवा पुरस्कार २०१८, राज्य युवा पुरस्कार, २०१५, जिल्हा युवा पुरस्कार, २००७ आदींचा समावेश आहे.

बंडु सितारामजी धोतरे हे चंद्रपूर येथील इको–प्रो या संस्थेचा संस्थापक अध्यक्ष असून त्यांनी बी.ए. उत्तीर्ण असुन आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ते विमा अभिकर्ता म्हनुन काम करतात. आपल्या महाविद्यालयीन जीवनापासून सर्वप्रथम सर्पमित्र म्हणून त्यांनी वन्यजीव व सामाजिक क्षेत्रात आपले कार्य सुरु केले. बंडू धोतरे सध्या महाराष्ट्र राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे सदस्य असून चंद्रपूर जिल्ह्याचे मानद वन्यजिव रक्षक देखील आहेत. चंद्रपूर जिल्हा पर्यावरण समिती, जिल्हा जैवविवीधता समिती, जिल्हा शांतता समिती, वृक्ष प्राधीकरण चंद्रपूर महानगरपालीका आदि समित्यावर ते सदस्य आहे. वन्यजिव संर्वधन, सर्प संवर्धन आणि प्रबोधन, पुरातत्व संर्वधन, आपातकालीन व्यवस्थापन, रक्तदान व इतर सामाजीक कार्यात सुद्धा ते कार्यरत आहेत. वाघ आणि पर्यावरण संरक्षणाकरीता आणि चंद्रपूर जिल्हयातील सामाजीक प्रश्नाकरीता त्यांनी काही आंदोलनेही केलेली असून ताडोबा तसेच लोहारा जंगल परीसरातील वन्यजिवांचा अधिवास, त्यांचे संचार मार्ग व चंद्रपुरातील पर्यावरणास धोकादायक प्रस्तावीत कोळसा खाण प्रकल्पाविरोधात 'अदाणी गो बॅक' आंदोलन चर्चेचा विषय ठरले होते. यासाठी सन २००८ मध्ये आठ दिवस नागपूर येथील हिवाळी अधिवेशन दरम्यान अन्नत्याग सत्याग्रह देखील केला होता. तसेच सन २००९ मध्ये चंद्रपुर रेल्वे स्थानकावरील मालधक्का प्रदुषण व शहरातील इतर प्रदुषणाविरोधात अन्नत्याग, सन २०१२ मध्ये वाघांच्या प्रभावी संरक्षणाच्या मागणी करीता अन्नत्याग आदीमधून त्यांच्या सहकाऱ्यांनी वन्यजीवांच्या कल्याणासाठी लढा दिला आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील गांवाचे पुनवर्सन कार्यात बंडू धोतरे आणि इको–प्रो संस्थेची मदत घेण्यात आली होती.



संकटग्रस्त वन्यप्राणी रेस्क्यु ऑपरेशन करतांना आजवर एकुण ९३ रेस्क्यु ऑपरेशन करीत वाघ, बिबट, अस्वल, मगर, रानगवे आणि तृणभक्षी प्राणी यांचे प्राण वाचविले आहेत. दि. १ मार्च २०१७ रोजी सुरु करण्यात आलेले **'चंद्रपूर किल्ला परकोट स्वच्छता अभियान'** तर देशात आगळेवेगळे आणि एकमेव ठरले आहे. या अभियानाची दखल ' **मन की बात '** मध्ये स्वतः **पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी** यांनी घेतली.



**चांदा किल्ला स्वच्छता अभियान**

आज ८५० हून अधिक दिवस झालेत तरीही हे किल्ला स्वच्छता अभियान सुरुच आहे. यामध्ये जवळपास ११ कि. मी. लांब किल्ल्याची स्वच्छता नियमित सकाळी ६ ते ९ या वेळेत श्रमदानद्वारे करण्यात येत असून यामध्ये इको प्रो चे स्वयंसेवक गेल्या दोन अडीच वर्षापासून दररोज स्वयंस्पुर्त भाग घेत असतात. या कार्याचा प्रसार राज्यभर व्हावा आणि प्रत्येक जिल्ह्यात आपापले वारसा स्थळे अशा प्रकारे वाचविता येऊ शकतात असा संदेश घेऊन यावर्षीच १ मे ते २० मे दरम्यान मोटार सायकलने संपूर्ण राज्यात महाराष्ट्र वारसा जतन आणि संवर्धन संदेश परिक्रमा आयोजित करून हा संदेश प्रत्येक जिल्ह्यात पोहोचविला होता. बंडू यांचा सर्पमित्र ते वाघमित्र हा प्रवास तरुणांनी कित्ता गिरवावा असाच आहे. सामाजीक क्षेत्रात इको–प्रो संस्थेच्या माध्यमातून नगर संरक्षक दल, वन्यजीव संरक्षक दल तर ग्रामीण भागात ग्राम रक्षक दलाची निर्मीती करून युवकांची मोठी चळवळ या माध्यमातून सुरू आहे. शेतकरी आणि वाघ संघर्ष टाळण्याकरीता शासनाकडे पाठपुरावा, शेतपीक व वन्यप्राणी संरक्षण करीता सौर उर्जा कुंपन योजना राबविण्यासाठी प्रयत्न, पर्यावरण जनजागृती करीता शाळांमध्ये इको–प्रो स्कुल क्लबची निर्मिती, जिल्ह्यातील महत्वपूर्ण असे कन्हारगांव अभयारण्या करिता पाठपुरावा, जिल्ह्यातील वनक्षेत्रातून प्रस्तावित चारपदरी रस्ते बांधकाम दरम्यान अंडरपासेसची मागणी करिता ४२ किमी मूल ते चंद्रपुर 'पैदल मार्च', यातुन शासनाचे लक्ष वेधन्यास त्यांना यश आले. ताडोबा बफर अंतर्गत गावातील शेतजमिनिवर बांधले जाणारे रिसोर्टचे बांधकाम होऊ नये म्हणून आवश्यक गावात नो–गो झोन, स्थानिक सल्लागार समितीच्या माध्यमाने लागू करण्यात यश, जिल्ह्यातील मानव–वन्यजीव संघर्ष असलेल्या गावात बिबट समस्या मुक्त करण्यास प्रयत्न, इको–प्रो संस्थेच्या माध्यमातून संस्थेचे अनेक सर्पमित्र शहरात व गावात सेवा देत आहेत. गांवखेड़यात सर्पदंश वर जनजागृती, प्रथमोपचार, अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य निरंतर सुरु आहे. ब्रम्हपुरी वनविभाग अंतर्गत मानव वन्यजीव संघर्ष दृष्टया अति संवेदनशील ४० गावात प्राथमिक रीस्पोन्स टीम तयार करणे व वनविभागाला यातून सहकार्य करणे. असे अनेक कार्य ते सध्या वेक्सतर्फे करीत आहेत.

**श्री बंडू धोतरे यांच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा.**



**चांदा किल्ला स्वच्छता अभियानात सहभागी इको–प्रो चे स्वयंसेवक**



**इको–प्रो च्या वारसा संवर्धन संदेश परिक्रमा चे अमरावती मध्ये वेक्स कडून स्वागत**

*****

# मातीचे गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा



**प्रा. डॉ. मंजुषा वाठ**
※ सहसचिव ※
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था

वनस्पती, प्राणी, पक्षी, पर्यावरणातील विविध घटकांचा अभ्यास आणि संवर्धन इत्यादींबाबत आवड व कळकळ असणारी काही समविचारी मंडळी यांनी एकत्र येऊन उभारलेली चळवळ म्हणजेच वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था होय. संस्थेच्या स्थापनेपासून विविध घटकांच्या अधिवासाबाबत अभ्यास, पर्यावरण ऱ्हासाकरिता कारणीभूत बाबी, त्यावरील उपाययोजना व संवर्धनाच्या दृष्टीने राबविलेले विविध उपक्रम यामुळे संस्थेला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.मुठभर लोकांसोबत सुरू झालेली ही संस्था आज वन्यजीव पर्यावरण व संवर्धन क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्रात लौकिकास प्राप्त झाली.

वनस्पती,पक्षी ,सरपटणारे प्राणी, फुलपाखरे सूक्ष्मजीव व इतर वन्यजीवांचे संशोधन, साहसी उपक्रम, जंगलभ्रमण,जंगल बचाव मोहीम,नैसर्गिक रंगांची महती, त्याबाबतचा कार्यशाळा इत्यादीं सोबतच २००५ पासून अमरावती जिल्ह्यातील जलव माती प्रदूषण रोखण्याचे उद्देशान`सामाजिक भान असलेला **' मातीचे गणपती बसवा निसर्गाची बांधीलकी दाखवा '** हा अतिशय स्तुत्य उपक्रम संपूर्ण अमरावती शहरात प्रथमत: राबविणारी संस्था म्हणजेच वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था होय.मूर्तिकाराकडून मातीच्या गणेश मूर्ती तयार करून नेहरु मैदान या सार्वजनिक ठिकाणी स्टॉल लावून नागरिकांकरिता उपलब्ध करून देणारी सर्वात पहिली हीच संस्था होय. त्यावेळी अगदी सर्व दुकाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीची मात्र संस्थेचा पर्यावरण पूरक गणेश मूर्तींचा संस्थेचा स्टॉल सर्वत्र कुतूहलाचा विषय ठरला. लोकमान्य टिळकांच्या आवाहनानंतर १९०० साली अमरावती शहरात पहिल्यांदा सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला गेला. इंद्रभवन थेटरमध्ये दादासाहेब खापर्डे, सरमोरोपंत जोशी इत्यादींनी पुढाकार घेऊन या उत्सवाची सुरुवात केली. अमरावती च्या ऐतिहासिक परकोटाच्या स्मृती आजही जपल्या आहेत. परंतु कालानुरूप लोकमान्यांनी सुरू केलेला गणेशोत्सवाचा हेतू आणि त्याचे मुळ स्वरूप पूर्णपणे बदलले डोळे दिपवणारी रोषणाई, ध्वनिवर्धकाच्या कर्कश्य भिंती, सोबतच गणरायाच्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, विसर्जनानंतर होणारे जलप्रदूषण चिंतेचा व चिंतनाचा विषय ठरला .

**ओंकार स्वरूप साकारणे कला**

मातीच्या गणेशमूर्ती तयार करणे एक कला आहे शिवाय त्यात कष्ट आहेत गाळाची माती भिजवायची,लोण्यासारखी मऊ होईस्तोवर मळायची काही मंडळी त्यात चिंचोक्याचे पीठ, चुना, गूळ इत्यादींचा वापर करीत. हळूहळू ही कला लोप पावू लागली, कारण प्लास्टरची मूर्ती बनविणे तुलनेने सोपे झाले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती तयार करणे तुलनेने सोपे व कमी वेळात अधिक फायदा मिळवून देणारे असते. हळूहळू त्याचे अक्षरश: कारखाने तयार झालेत. प्लास्टरच्या चकचकीत मूर्त्यांची मागणी वाढली व मूर्तीकलेला उतरती कळा लागली.



**प्लास्टर ऑफ पॅरिस नको**


※ प्लास्टर ऑफ पॅरिस पाण्यात विरघळत नसल्यामुळे मूर्त्या अनेक दिवस तशाच पडून राहतात.

※ भंगलेल्या गणेशमुर्ती विसर्जना नंतर तलावाकाठी नदीकाठी व इतरत्र विखुरलेल्या स्वरूपात बघणं अत्यंत वेदनादायी व अस्वस्थ करणार वास्तव असतं.

※ प्लास्टरचा गाळ पाण्यातील जिवंत झरे बुजवीतो, शिवाय पाण्यातील अन्नसाखळी खंडित करतो. पर्यायाने संपूर्ण पर्यावरण दूषित होते.

※ मूर्त्यांचे विसर्जन तलाव, विहिरी, नद्यांमध्ये केले जाते व मोठ्या प्रमाणात जलप्रदूषित होते.

※ गणेशोत्सवा दरम्यान थर्माकोल, प्लास्टिक अशा कितीतरी विघटन न होणाऱ्या घातक वस्तू निर्माल्यासहित पाण्यामध्ये टाकल्या जातात.



**संस्थेचा उपक्रम– व मूर्तिकार**

२००५ सालापासन वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेने अमरावती शहरात प्रथमच प्रदूषणमुक्त गणेश उत्सव हे जनजागृती अभियान हाती घेतले. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती पूजन करावे असे

आवाहन केले मात्र सामान्य नागरिकांना मातीच्या मुर्ती सहज उपलब्ध होत नसत. ही अडचण लक्षात घेता, संस्थेने मातीच्या गणेशमूर्ती नागरिकांकरिता पहिल्यांदा नेहरू मैदान येथे उपलब्ध करून दिल्यात. जागरूक नागरिकांनी मातीच्या गणेशमूर्तींना प्राधान्य दिले संस्थेच्या स्टॉलला दरवर्षी भरभरून प्रतिसाद मिळत गेला. हळूहळू हे लोन शहरातच नव्हे,तर जिल्ह्यात सर्वदूर पसरले आणि मातीच्या गणेशमूर्तींची मागणी वाढीस लागली. त्यामुळे मूर्तिकार यांमध्ये ही हुरुप आला. अनेक मूर्तिकार पुनश्चमातीच्या गणेशमूर्तींची निर्मिती करू लागले, त्यांची कला बहरली, उत्पन्नाचा स्त्रोतही वाढीस लागला आता नेहरू मैदानात मातीच्या गणेशमूर्तींचे अनेक स्टॉल बघावयास मिळतात हेच संस्थेचे मोठे यश म्हणावे लागेल.

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था या एकट्या संस्थेने संपूर्ण जिल्ह्याची मागणी पूर्ण करणे शक्य नव्हते. तरीही हे जागृती अभियान याही पुढे राबविण्याचा विडा संस्थेने उचलला व गेल्या १३ वर्षापासून सातत्याने संस्थेच्या इतर कामांसोबत हा उपक्रम एक अविभाज्य अंग बनला. मातीच्या गणेशमूर्ती लोकांनी बसवाव्या या करिता संस्थेने जागृतीची पहिली ज्योत लावली आणि आज त्याची दिपमाळ तयार झाली. अमरावती शहरातील अनेक शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, राजकीय व्यक्ती याउपक्रमांमध्ये सहभागी झाल्या. हल्लीशहरात अनेक ठिकाणी मातीच्या गणेशमूर्तींचे स्टॉल बघावयास मिळतात.मातीच्या गणेश मुर्त्याची चळवळ अमरावतीत पहिल्यांदा उभारणारी संस्थाही ओळख निर्माण करण्यासोबतच इतर संस्थांना प्रेरित करून त्यांनीही मातीच्या मूर्तीचे स्टॉल लावणे यातच संस्थेचे मोठे यश म्हणावे लागेल. हळूहळू अमरावती शहर नव्हे संपूर्ण राज्य, प्लास्टर ऑफ पॅरिस मुक्त होईल तो दिवस संस्थेकरीता आनंदाचा दिवस ठरेल.



### संस्थेचा स्तुत्य उपक्रम व तरुणाई

आजची तरुण पिढी उद्याचे उज्वल भविष्य आहे समाज जागृती करता विद्यार्थी हे उत्तम माध्यम आहे. WECS च्या माध्यमातून विद्यार्थी या पर्यावरण पूरक उपक्रमाशी जोडले जातात. स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवक म्हणून कार्य करतात.मुर्त्या आणणे स्टॉलवर लावने, वेळेचे नियोजन व्यक्तिमत्व विकास व समाजभान यातून शिकतात, हीच मंडळी पर्यावरण संवर्धनाचा वसा पुढे नेतात. या उपक्रमाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने समाजात कार्यरत आहेत बहुतांश विद्यार्थ्यांनी आपापल्या गावी हा उपक्रम सुरू केला आहे. संवेदनशील पर्यावरणाप्रती जागरूक नागरिक घडविण्यात संस्थेचा अल्पसा वाटा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावती., भारतीय महाविद्यालय, अमरावती. विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती., शासकिय विदर्भ महाविद्यालय, अमरावती. , नरसम्मा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,किरण नगर, अमरावती श्री. ब्रिजलाल बियाणी व महात्मा फुले महाविद्यालय,भातकुली, केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती या महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून दरवर्षी सहभाग हा असतो.



### मातीचे गणपती बनवा कार्यशाळा

लहान मुले मातीच्या गोळ्याप्रमाणे असतात त्यांच्यात संस्कार रुजविणे म्हणजे पुढील जागृत पिढीनिर्माण करणे होय म्हणून संस्थान मातीचे गणपती स्वतःच्या हाताने बनवून स्वतः कुंचल्याने रंगविण्याची कार्यशाळा विविधशाळां मधून घेत असते शाळांचे विद्यार्थी अतिशय हौसेने घरच्या घरीमूर्ती तयार करण्याचे कौशल्यातून शिकत असतात. २०१२ पासून कागदी लगद्याच्या गणेशमूर्ती नैसर्गिक रंगांनी रंगवून स्टॉलवर ठेवण्यात आल्यात. त्यांची प्रचंड मागणी झाली परंतु अशा पद्धतीने ही पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करता येऊ शकतो हे सांगण्याचा तो एक प्रयत्न होता



### प्रदूषण मुक्त गणेशोत्सव प्रदूषण मुक्त गणेश विसर्जन

पर्यावरण हिताचा विचार करता गणेशमूर्ती पर्यावरण पूरक असावी व विसर्जित केल्यानंतर पंचमहाभूतात विलीन व्हावे. पाण्याचे दुर्भिक्ष व उपलब्धता याचाही विचार होणे आज गरजेचे आहे. दरवर्षी हजारो टन प्लास्टर जर आपण पाण्यामध्ये टाकल तर भविष्यात पाण्याचे दुर्भिक्ष

अधिकच तीव्र होईल. या दृष्टीने संस्थेचे स्वयंसेवक विद्यार्थी गणेशमूर्त्या कुठल्याही तलाव विहीर व इतर पाण्यात न टाकता महानगरपालिकेने नेमून दिलेल्या जलाशयातच विसर्जित कराव्यात याकरिता कार्यरत असतात.

न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचा वापर करण्या संदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे आखून दिलीत. अमरावती महानगरपालिकेने सुद्धा याबाबत पुढाकार घेतला. विसर्जनाकरिता कृत्रिम तलावाची निर्मिती केली. परंतु बाप्पाच्या उत्सवात कोर्टाची ऑर्डर हवेत विरून जाते. बाकी पर्यावरण, ध्वनिप्रदूषण यांसारख्या शुल्लक गोष्टींकडे आम्ही दुर्लक्ष करतो. दरवर्षी बाप्पाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतोय. भव्य दिव्य बाप्पाच्या पायावर डोकं ठेवण्यासाठी सर्वत्र प्रचंड चढाओढ लागलेली दिसते. हरवतोय तो सारासार विचार. दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्षण,पर्यावरणाची अपरिमित हानी याचा विचार होणे आज काळाची गरज आहे. हाच विचार प्रत्येकापर्यंत पोहविण्यार्ची संस्थेची घडपड आहे.तेव्हा वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या **मातीचे गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा** या उपक्रमामुळे हळूहळू श्री गणेश समाज मनात रुजतोय याचा मनस्वी आनंद वाटतो.

*****















# पक्षी अभ्यास, नोंदणी व संशोधनातील संस्थेची वाटचाल



**डॉ. जयंत वडतकर**
सचिव
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (Wildlife and Environment Conservation Society) म्हणजेच वेक्स संस्थेची स्थापना ही २000 सालची, त्यापूर्वी १९९७ पासून राजू कसंबे आणि जयंत वडतकर यांनी केलेली पक्षीनिरीक्षणाची सुरुवात आणि त्यानंतर गजानन वाघ, शैलेंद्र चौधरी, केदार पावगी, प्रकाश आडे व तेव्हा शाळकरी असलेले नंदकिशोर दुधे, विक्की गवई व विशाल गवळी असे एकेक जुळत जाऊन पक्षी निरीक्षकांचा एक गट तयार झाला, पुढे वनस्पती संदर्भात मार्गदर्शनासाठी डॉ. प्रभा भोगावकर, सर्पमित्र राघवेंद्र नांदे यांचेसोबत परिचय होऊन पर्यावरण व वन्यजीवन यांचा अभ्यास व संवर्धनासाठी एक संस्था असावी असा विचार होऊन २000 सालच्या वन्यजीव सप्ताहात वेक्स या संस्थेची स्थापना झाली. सुरुवातीच्या काळात संस्थेचा भर प्रामुख्याने पक्षीविषयक अभ्यासावरच होता, सोबत सोबत सर्प संवर्धन व पर्यावरण जनजागृती विषयक कार्यक्रम अधून मधून व्हायचे. पुढे कार्यक्रमांची आणि विषयांची व्याप्ती वाढत गेली आणि संस्था अनेक कार्यक्रमांचे आयोजन करू लागली. कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत न घेता जसे जमेल तसे व संस्थेशी जुळलेले सर्व सदस्य हे शासकीय किंवा खासगी कंपनी इ. ठिकाणी कार्यरत असल्याने जसा ज्यांचा वेळ मिळेल तसा हातभार लावत कार्यक्रम पार पाडल्या जात होते.

या सर्व कार्यक्रमांमध्ये पक्षी विषयक कार्यक्रमातील सातत्य हे कायम राहिले ते जास्तीत जास्त सभासद हे पक्षी अभ्यासक असल्यामुळे पुढेही सातत्याने नवनवीन पक्षी निरीक्षकांची यात भर पडत गेल्यामुळे. आज गत १९ वर्षापासून वेक्स ही संस्था अमरावती जिल्हा, विदर्भ प्रदेश तसेच सातपुडा पर्वतरांगेमध्ये पक्षी अभ्यास, संशोधन, नोंदणी व संवर्धन यासाठी सतत कार्यरत असून संस्थेने व संस्थेच्या अनेक पक्षी अभ्यासकांनी आतापर्यंत अनेक पक्षीविषयक प्रकल्प व संशोधने पूर्ण केले असून त्यावर अनेक महत्वपूर्ण Research Papers व पुस्तके प्रकाशित झालीत, तसेच संस्थेचे सदस्य Bombay Natural History Society, (BNHS) महाराष्ट्र पक्षिमित्र अशा संस्थेसोबत जुळल्याने विचारांची व माहितीची देवाणघेवाण सुरु होऊन अभ्यासाची व्याप्ती वाढतच गेली. संस्थेचे सचिव डॉ. राजू कसंबे यांनी Indian Grey हॉर्नबिल पक्ष्यावर संशोधन करून आचार्य पदवी मिळविली व पुढे त्यांना थेट BNHS या पक्षीविषयक कार्य करणाऱ्या संस्थेत काम करण्याची संधी मिळाली. ही संस्थेच्या सातत्यपूर्ण व शास्त्रीय पद्धीतीने केलेल्या कामाची पहिली पावती होती.

स्थापने पासून ते २0१0 पर्यंतच्या पहिल्या दशकात संस्थेने केलेल्या अभ्यासाच्या व नोंदणीच्या आधारे २0१0 साली अमरावती जिल्ह्याची पक्षीसूची Checklist of Birds of Amravati District प्रकाशित केली. विशेष म्हणजे पूर्वीच्या उपलब्ध १७५ पक्ष्यांच्या यादीत जवळपास ७५ पक्ष्यांचा नव्याने समावेश करून ही सूची तयार करण्यात आली होती. या पक्षीसुची मध्ये पोहरा-मालखेड व महेंद्री राखीव जंगल सोबतच मेळघाट च्या पक्षी सूचीमधील पक्ष्यांचा सुद्धा समावेश होता. यामध्ये एकूण ३४१ पक्षी समाविष्ट होते. या पक्षीसुचीचा आधार घेऊन पुढे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्याच्या पक्षीसुची प्रकाशित झाल्यात त्यामध्ये वेक्सच्या सदस्यांनी मदत व मार्गदर्शन केले.

या पक्षीसुची प्रकाशनानंतर पुढील ५-६ वर्षात, संस्थेला पक्षी विषयक क्षेत्रात विस्ताराने काम करण्याची व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत जुळण्याची संधी प्राप्त झाली व यातूनच २0११ ते २0१६ दरम्यान संस्थेने व संस्थेच्या सदस्यांनी अनेक पक्षी अभ्यास व नोंदणी, पक्षीविषयक कार्यक्रम, संशोधन प्रकल्प सातत्याने राबविलेत. यामध्ये Birdlife International UK यांच्या सहाय्याने Bombay Natural History Society, Mumbai सोबतचा, रानपिंगळा (Forest Owlet) या पुनर्शोध लागलेल्या अतिदुर्मिळ पक्ष्याच्या सातपुड्यातील व इतर समांतर अधिवासातील विस्तार व अस्तित्वाचा अभ्यास प्रकल्प (Forest Owlet Project, in Satpuda Range ) तसेच राफ्टर रिसर्च अँड कन्झर्वेशन फाउंडेशन (RRCF) या संस्थेने मेळघाट मधील घुबड प्रजातींवर अभ्यास करण्यासाठी डॉ. जयंत वडतकर यांना वेक्सच्या माध्यमातून दिलेली फेलोशिप (Owls and Owlet study Project in Melghat), संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. गजानन वाघ यांना मिळालेला Malabar Pied हॉर्नबिल पक्ष्यावरील अभ्यास प्रकल्प, (Status & Distribution Survey of Malabar Pied Hornbill in Melghat Tiger Reserve) तसेच संस्थेने आवश्यकता ओळखून स्वतःच्या पक्षी अभ्यासकांच्या मदतीने कुठल्याही बाहेरील आर्थिक मदतीविना राबविलेले Grassland Bird Study Program, Bird Habitat Development Program, Satpuda bird Survey, या सह Water Bird Survey in Melghat Backyard Bird Count, Asian Waterfowl Census, Common Bird Monitoring Program, Salim Ali Bird Count, Baya Weaver Count अशा कार्यक्रमांमध्ये सुद्धा सक्रीय सहभाग घेतला. संस्थेसोबत अगदी शालेय जीवनापासून

दहाव्या वर्षी पासून जुळलेले नंदकिशोर दुधे यांना सर्वप्रथम संस्थेच्या रानपिंगळा पक्ष्यावरील अभ्यास प्रकल्पात जैवअभ्यासक म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली आणि यात केलेल्या प्रामाणिक कामाच्या अनुभवावर त्यांना सुद्धा पुढे BNHS या संस्थेत काम करण्याची संधी मिळाली, ही आमच्या पक्षीविषयक कार्यक्रमाची दुसरी पावती होती.

आता संस्था दरवर्षी विद्यार्थी व निसर्गप्रेमींसाठी अनेक पक्षीनिरक्षण कार्यक्रम व हिवाळ्यामध्ये बर्ड फेस्ट (Bird Fest) चे सुद्धा आयोजन करीत असते, यामध्ये एका दिवसभरात ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी पक्षी निरीक्षणाचा आनंद व अनुभव घेत असतात. संस्थेचे अनेक सदस्य महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलने, विदर्भ पक्षिमित्र संमेलनात नियमितपणे उपस्थित राहून आपला अभ्यास सुद्धा सादर करीत असतात. याशिवाय पक्षीविषयक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आपल्या विदर्भातील व सातपुड्यातील अभ्यास सुद्धा मांडत असतात. संस्थेचे अनेक पक्षी अभ्यासक आज आपली निरीक्षणे शास्त्रीय पत्रीकांमधून प्रकाशित करीत असतात ही संस्थेची सर्वात जमेची बाजू आहे.

संस्थेने आजवर दोन पक्षिमित्र संमेलनांचे यशस्वी आयोजन केले असून त्यामध्ये २००९ साली ११ व्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन तसेच २०१३ मध्ये २६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे भव्य आयोजन सुद्धा केले होते. ११ व्या विदर्भ संमेलनाचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरात, प्राणीशास्त्र विभागा सोबत व स्व. डॉ. गणेश वानखेडे यांचे सहकार्याने उत्कृष्टपणे आयोजित करण्यात आले होते. या संमेलनास २५० पेक्षा जास्त सहभागींची नोंदणी होऊन दोन दिवसात उत्कृष्ट अशी विविध विषयावरील सादरीकरणे व चर्चा पार पडल्या होत्या. या संमेलनाच्या अध्यक्षपदी तेव्हा BNHS मध्ये रूजू झालेले डॉ. राजू कसंबे हे होते.

२६ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन अमरावती मधील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे पार पडले, या संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ पक्षी अभ्यासक संमेलनाचे उद्घाटक अरण्यऋषी मारूती चितमपल्ली हे होते. श्री. गोपाळराव ठोसर हे अध्यक्ष म्हणून होते. भरगच्च उपस्थिती, उत्कृष्ट निवास व्यवस्था, रुचकर जेवण, तिसऱ्या दिवशी मेळघाटची सहल यासाठी हे संमेलन अनेकांच्या कायम स्मरणात राहिले होते. सर्वात विशेष म्हणजे या संमेलनात राज्यभरातील अभ्यासू वक्त्यांचे सादरीकरणे व महत्वच्या विषयांवरील चर्चा यासाठी सुद्धा हे संमेलन विशेष ठरले होते. या दोन्ही संमेलनांचे आयोजन हे सर्वोत्तम व मैलाचा दगड ठरलेत. याच दरम्यान पक्षीअभ्यासकांच्या कार्यशाळा (Series Ornithology Workshop) BNHS संस्थेच्या सहकार्याने केलेलं आयोजन सुद्धा वैशिठ्यपूर्ण ठरले होते या अंतर्गत संस्थेने एकूण चार कार्यशाळांचे आयोजन केले होते.

२०११ नंतर संस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने व सातत्याने पक्षीअभ्यासात व्यस्त राहिल्यामुळे व पक्षी संशोधन प्रकल्पाच्या कामांमुळे मेळघाटात व विदर्भात संस्थेच्या अभ्यासकांकडून अनेक नवनवीन नोंदी होत राहिल्या व पक्षी विषयक ज्ञानात सतत भर पडत गेली, त्याचेच फलित म्हणून संस्थेने मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या पक्षीसुचीमध्ये तब्बल २९ पक्ष्यांची भर घातली तर मेळघाट बाहेरील अमरावती जिल्ह्यातील इतर प्रदेशमध्ये सुद्धा ५५ नवीन पक्ष्यांच्या नोंदी केल्यात. नवीन नोंदीपैकी Long-billed plover, Hume's Lark & River Lapwing Breeding in Tapi river, Melghat अश्या काही नोंदी ह्या थेट महाराष्ट्रात प्रथम ठरल्या तर अनेक पक्षी विदर्भासाठी नव्याने नोंदविले गेलेत. त्यामुळे मेळघाट ची यादी २६५ वरून २९५ इतकी झाली तर संपूर्ण जिल्ह्याची यादी ३४१ वरून ३९२ वर पोहचली. या दरम्यान पक्षी अभ्यास नोंदि पुरता मर्यादित न ठेवता वेक्सच्या पक्षी अभ्यासकांनी पक्ष्यांमधील Range extension, status and distribution, back migration,Habitat study and threats and problems, subspecies distribution अश्या विविध पैलूंवर अभ्यास करून अनेक लेख Research Articles, Notes and Research papers सुद्धा प्रकाशित केलेत. जिल्ह्यातील पक्षीविश्वामध्ये झालेल्या ह्या अनेक बदलांमुळे, झालेल्या अनेक नवीन नोंदींमुळे व २०१० साली प्रकाशित केलेल्या पक्षीसुचीची पूर्वीची आवृत्ती संपल्यामुळे, २०१६ साली पुन्हा दुसरी सुधारित आवृत्ती काढावी लागली. या पक्षी अभ्यासाच्या प्रवासात गेल्या नऊ वर्षात डॉ. जयंत वडतकर, डॉ. गजानन वाघ, नंदकिशोर दुधे, किरण मोरे, अल्केश ठाकरे, निनाद अभंग, शिशिर शेंडोकार, गौरव कडू, सौरभ जवंजाळ, ऋतुजा कुकडे, डॉ. आशिष चौधरी, डॉ. वेद पत्की, प्रशांत तीरमारे, विशाल गवळी आदींचा सहभाग होता.





*****

# निसर्गरंग वाचवतील निसर्ग



**डॉ. अंजली देशमुख**
अध्यक्ष
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था
अमरावती

वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनासाठी सर्वच स्तरावरून प्रयत्न होत आहेत. रासायनिक रंगाच्या वापरामुळे फार मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत असून ते मानवी जीवनाला अत्यंत धोकादायक ठरत आहे रासायनिक रंग तयार करत असताना त्यामध्ये पारा, कॅडमिअम, लेड, आर्सेनिक व झिंक ऑक्साईड यांसारख्या जड धातूंचा उपयोग केला जातो. हे धातू कर्करोगजन्य असून मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहेत. रंग उत्पादन करणाऱ्या कारखान्यांमधून बाहेर पडणारे सांडपाणी, धूर व अविघटनशील पदार्थांमुळे जल व वायू प्रदूषण होत आहे. त्यामुळे वनस्पती व जलचर प्राण्यांच्या अनेक प्रजाती नामशेष झाल्या आहेत तर काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्याला आळा घालण्यासाठी नैसर्गिक रंगाचा वापर ही काळाची गरज आहे मी स्वतः शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथे टेक्सटाईल व क्लोथिंग विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. १९९७ पासून मी नैसर्गिक रंग व त्याच्या उपयोजित शास्त्र यावर संशोधन करीत आहे. त्यानिमित्ताने आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये सहभागी होत असते. रासायनिक रंगांचा वापर टाळण्यासाठी केवळ जागृती पर्याप्त नसून त्याला पर्यायी उपाय सुचविल्याशिवाय त्याची अंमलबजावणी परिणामकारक होऊ शकत नाही याबाबत सर्व अभ्यासकांचे एक मत तयार झाले आहे

म्हणूनच वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेतर्फे २००७ सालापासून शाळा व महाविद्यालयामधून ''नैसर्गिक रंगाचा वापर कसा करावा'' या विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यास सुरूवात केली त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळू लागला. नैसर्गिक रंगांबद्दल समाजामध्ये विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये आवड, कुतूहल निर्माण करून त्याचा वापर करण्याकडे लोकांना प्रवृत्त करण्यासाठी एकत्रित व परिणामकारक कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या स्तरावर व्हावे या हेतूने जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात'ग्रीन टेक्सटाईल्स',ग्रीन फॅशन्स,एक्झीबिशन अॅन्ड कॉम्पिटीशन फॉर ग्रीन एन्व्हायर्नमेंट या संकल्पनेवर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था व वेक्स यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येते. या कार्यशाळेसाठी राज्यातून सुमारे २५० ते ३०० विद्यार्थी दरवर्षी सहभागी होत असतात. रासायनिक रंगांचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येते. या कार्यशाळेमध्ये निसर्गातून नैसर्गिक रंग कसे मिळवता येतील याची माहिती प्रात्यक्षिका व्दारे विद्यार्थ्यांना देण्यात येते. सभोवताल आढळणारी फुले,पाने यांचे विविध स्त्रोत उदा. डाळिंबाची साल,हळद,पळसाची फुले,बीक्सा म्हणजे शेंदरीची फळे, काथ,हरडा यांचा वापर करून तयार करण्यात आलेले २० ते २५ नैसर्गिक रंग विद्यार्थ्यांना ग्रिटींग्ज व पोस्टर्स रंगविण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतात. नैसर्गिक रंग हे रासायनिक रंगापेक्षा आकर्षक आणि टिकाऊपणाबाबत कुठेही कमी नाहीत हे प्रत्यक्ष कृती कार्यक्रमाव्दारे पटवून देण्यात येते. या कार्यशाळेच्या माध्यमातुन सुमारे २५० ते ३०० आकर्षक ग्रिटींग्ज कार्ड व पोस्टर्स विद्यार्थी तयार करतात. ग्रीन टेक्सटाईल्स व ग्रीन फॅशन्स अंतर्गत रासायनिक रंगांच्या वापरामुळे संपूर्ण जगात वस्त्रोद्योगातून निर्माण होंणारे प्रदूषण टाळून मानवी आरोग्याला उपयुक्त नैसर्गिक रंगांचा वापर करण्याबद्दल जनजागृती करण्यात येते.




अनेक वर्षाच्या निरंतर व अथक परिश्रमातून नैसर्गिक रंगांचा वापर करून तयार केलेल्या रेशमी लोकरी,सुती कपडे व त्यापासून निर्मित पोशाख यांची मांडणी आयोजित प्रदर्शनीमध्ये करण्यात येते. संपूर्ण पर्यावरणपूरक नैसर्गिक रंगाच्या वापरातून तयार केलेले टेबल लीनन सेट, साड्या व जगप्रसिध्द कमलकारी पेंटींग्ज हे प्रदर्शनीच्या माध्यमातून शहरातील सामान्य नागरीकांपुढे सादर करण्यात येते. नैसर्गिक रंगांचा वापर करून अत्यंत आकर्षक वस्त्र व पोशाख तयार करता येतात याबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्यात यश प्राप्त झाले आहे. या प्रदर्शनीमध्ये नैसर्गिक रंगापासून तयार केलेले ग्रिटींग्ज व पोस्टर यांची मांडणी करण्यात येते. शहरातील सर्वच स्तरातील सुमारे ३००० लोक प्रदर्शनीला भेट देत असतात. नैसर्गिक रंगांचा वापर करून रासायनिक रंगापासून निर्माण होणारे प्रदुषण सहजपणे टाळता येऊ शकते. लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो. अनेक व्यक्तीनी यापुढे नैसर्गिक रंगाचाच वापर करण्याबद्दल आपली कटीबध्दता व्यक्त केली आहे. कार्यशाळा व

प्रदर्शनी नैसर्गिक रंग व त्याव्दारे पर्यावरण व निसर्ग संवर्धन याबद्दल वृत्तपत्रे, प्रसिध्दी माध्यमे व प्रचार–प्रसार माध्यमे हे मोठ्या प्रमाणावर वृत्त व बातम्या प्रसिध्द करून लक्षावधी लोकांपर्यंत प्रभाविपणे हा संदेश जनजागृती करण्यास मोलाचे सहकार्य करतात 'पर्यावरण प्रदुषण टाळा–रासायनिक रंगांना घाला आळा ' हे ब्रीदवाक्य
मनात बाळगुन सुरू केलेल्या या उपक्रमाची निरंतरता टिकावी व नैसर्गीक रंगाचे विश्व जास्तीत जास्त विद्यार्थी, युवक, शिक्षक, उद्योजक, व्यापारी व समाजातील सर्व स्तरातील घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यशाळा,''मातीचे गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा '' अशा कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात येते.

२ ऑक्टोबर २०१२ साली कोलंबस,अमेरिका येथे संपन्न झालेल्या वर्ल्ड इको समिट मध्ये सहभागी होऊन मी नैसर्गिक रंगांच्या माझ्या संशोधनावर शोध निबंध सादर केला. या जाणिवेतून या संकल्पनेवर आधारीत नैसर्गिक रंगांची कार्यशाळा, शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेच्या उद्यानात तसेच संत ज्ञानेश्वर सांस्कृतीक भवनात आयोजित करण्यात येतात. या उपक्रमांमध्ये अजिंठा, वेरूळ व इतर गुहांमधिल कमलकारी,मधुबनी,फाड व मिनीएचर या अत्यंत पुरातन जगप्रसिध्द पेंटिंग्ज या विशिष्ट नैसर्गिक रंगांची अत्यंत प्राचीन इतिहास व परंपरा असणाऱ्या प्रकारांचा समावेश होणारे विद्यार्थी व भेट देणारे शेकडो नागरिक यामध्ये निसर्गाबद्दल असलेली आस्था दिसून येते व त्याचबरोबर एक नविन उमेद, प्रेरणा त्यांना मिळते. निसर्गाला अधिक जवळ करण्याची,निसर्गाशी मैत्री करण्याची व त्यामधून मानव आणि निसर्ग संरक्षणाची संधी मिळावी असे मनोगत प्रेक्षक आपल्या प्रक्रीयेमधुन वेळोवेळी व्यक्त करतात. नैसर्गिक रंगांचा वापर करून रासायनिक रंगाच्या द्वारे होणारे प्रदुषण टाळण्यासाठी सुरू केलेले हे प्रयत्न विविध माध्यमे व उपक्रम या व्दारे निरंतर सूरू ठेवायचे आहे

**'बाप्पा कागदी लगदा व नैसर्गिक रंगाचे, करतील रक्षण पर्यावरणाचे'**

आजची पर्यावरणरची गंभीर समस्या पाहता मातीचे शाडूचे,कागदी लगद्याचे बनवलेले नैसर्गिक रूपातील बाप्पा आणि त्यांना तशाच नैसर्गिक रंगात रंगवले तर जलप्रदुषण रोखता येईल. अशाच गणेश मुर्तीचा वापर केल्यास पर्यावरणाचे रक्षण होईल हे ध्येय समोर ठेवून संस्थेने कागदी लगदा व मातीपासून गणेश मूर्ती तयार करून एक नविन पर्याय उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला. कागदी लगदा व मातीच्या मिश्रणातून तयार केलेले बाप्पा व त्यांना रंगविण्याकरीता वापरलेले नैसर्गिक रंग,जलप्रदुषण रोखण्याचा उत्तम उपाय आहे. जिप्सम सारचे अविघटनशील पदार्थ पाण्याचे जडत्व वाढविते. दोन्हीचा एकत्रित परिणाम पाण्याचा जीवनस्तर वाढविण्याची क्षमता व दर्जा कमी करण्यावर होतो. ज्या मुळे कधी न भरून निघणारे असे पर्यावरणाचे नुकसान होते. मानवी आरोग्याचा विचार केल्यास गणेश मुर्तीचे सुशोभिकरण करण्यास वापरण्यात येणारे रासायनिक रंग अत्यंत घातक रंगामध्ये असलेला पारा कॅडमियम शिसे हे धातू जे की मज्जातंतू व मूत्रपिंडासाठी विष समजले जातात. जेवढे गडद आणि चटक रंग तेवढे त जास्त विषारी, लाल, निळा,केसरी व हिरव्या रंगांमध्ये पारा,झिंकऑक्साईड, क्रोमिअम आणि शिस्याचे प्रमाण जास्त आढळून येते. विस एकर क्षेत्रफळाच्या तलावामध्ये वर नमूद जड धातू युक्त रंगांचा थेंब तलावातील मासे विषारी करण्यास पुरेसा आहे. हेच विषारी मासे,पक्षी, प्राणी तसेच मनुष्य जातीने खाद्य म्हणून वापरल्यास त्याचे अनिष्ठ व गंभीर परिणाम दिसून येतात. हे सर्व लक्षात घेता गणेशउत्सवाच्या दरम्यान पर्यावरण पूरक असणाऱ्या मातीच्या अथवा कागदाचा लगदा व मातीच्या मिश्रणातून तयार करण्यात आलेल्या मूर्ती येणाऱ्या काळात एक उत्तम पर्याय आहे. निसर्गात उपलब्ध असणारे असंख्य रंगाचे स्त्रोत, ज्यांचा वापर करून तयार करण्यात आलेले पवित्र व मंगल असे रंग त्याचे दाखले आपल्या पुराणामधुन सुध्दा दिसून येतात. विविध झाडांची पाने,फुले,फळे या पासून जसे हळद, चुना, काथ,जांभूळ,झेंडुची फुले,डाळींबाची साल यसापासून रंग तयार करून त्याचा वापर गणेशमुर्ती रंगविण्यास जर केला तर नैसर्गिक रंगच वाचवतील निसर्ग.... हाच प्रत्यय निश्चितपणे आपल्याला आल्या शिवाय राहणार नाही.



**'हळदीपासून तयार केलेले नैसर्गिक कुंकू'**

अलिकडे देवपूजेसाठी वापरण्यात येणारे रासायनिक कुंकू यामुळे मानवी त्वचेवर होणारे दुषपरिणाम टाळण्यासाठी हळदीपासून तयार केलेले कुंकू सुध्दा आम्ही संस्थेच्या स्टॉलवर उपलब्ध करून देत असतो. गेल्या बारा वर्षात या उपक्रमाला मिळणाऱ्या वाढत्या प्रतिसादात प्रसिध्दी माध्यमाचे मोठे योगदान आहे. शिवाय संस्थेंच्या कार्यकर्त्यांचे अथक प्रयत्न व परीश्रम सुध्दा याला कारणीभूत आहे. देश व राज्य पातळीवर अनेक संस्था या क्षेत्रात जनजागृती करण्यास अग्रेसर अहे. परंतु अमरावती मध्ये वन्यजीव व संवर्धन संस्था ही यामध्ये अग्रणी असून सर्व प्रथम हा उपक्रम राबविणारी संस्था असल्याचा आवर्जुन उल्लेख करावासा वाटतो. या संकल्पनेचा प्रसार व्हावा या उद्देशातून



प्रमाणावर रंगांची खरेदी करतांना दिसतात. रंगाची उधळण करण्याकरीता विविध माध्यमांचा जसे पिचकारी,फुगे,बादल्या व वेळेप्रसंगी पाण्याने भरलेल्या हौदात सुध्दा रंग केले जातात. परंतू लक्षात घ्या, हे क्षणिक आनंद देणारे रंग मानवी जीवन आणि पर्यावरणाकरीता अत्यंत घातक आहेत. या रंगांमध्ये मोठया प्रमाणात विषारी व घातक अशा रासायनिक रंगद्रव्यांचा उपयोग केला जातो. हे रंग मानवी त्वचेच्या संपर्कात येवून छिद्रांव्दारे शरीराच्या आत शिरकाव करतात व त्यामुळे त्वचेच्या रोगांना आमंत्रण देतात. रासायनिक रंगाचा कमीत कमी उपयोग करून मानवी आरोग्य व पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान थांबविणे गरजेचेच आहे. संपूर्ण जगासमोर हे एक मोठे आव्हान आहे. प्राचिन काळात होणाऱ्या नैसर्गिक रंगाचा वापर जो जवळपास लोप पावला होता तो नव्याने सुरू झाला आहे. तेव्हा पूर्वजांचा ठेवा व संस्कृतीचा वारसा चालविणे ही एक नैतिक जबाबदारी रंगांचा वापर व प्रसार ही काळाची गरज आहे. नेमके हेच ध्येय समोर समोर ठेवून संस्था त्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे.






*****

# मेळघाटातील निसर्गभ्रमण



**सौ. प्राची पालकर**
कार्यकारीणी सदस्य
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था
अमरावती

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था आपल्या इतर निसर्गपूरक उपक्रमांसोबत मेळघाटातील रम्य वाटांवर पदभ्रमण कार्यक्रमही आयोजित करते. पदभ्रमण हा कुठल्याही वयात जोपासता यावा असा सर्वांगसुंदर छंद असून तो जोपासण्यास वयाचे बंधन नाही. आपण सगळे निसर्गप्रेमी आहोतच त्यामुळे पर्यटनप्रेम ओघाने येतेच, त्यातही जंगलभटकंती हा सगळ्यांच्या आवडीचा विषय असतो. भटकंती ही प्रत्येकाला आवडत असली तरी काही वाटा अश्या असतात ज्यावरील सौंदर्य फक्त चालतच नीट अनुभवता येतं. डोंगररांगा, दऱ्या दूर उभे राहून पाहणे यापेक्षा त्या डोंगररांगां मधून पायी फिरणे निश्चितच जास्त सुखावह असते हे पदभ्रमणाचा अनुभव असणाऱ्यांना माहिती आहे. पदभ्रमणाच्या वाटेवरील निरव शांतता, शुद्ध हवा, पक्षांचे सुतधुर आवाज, पानांची सळसळ, हिरवाई मनाला मोहित करते, ज्याला हा छंद जडला तो फार काळ निसर्गापासून दूर राहूच शकत नाही. गिरिभ्रमण करतांना माणूस निसर्गाशी एकरूप होतो तसेच या छंदात माणसाच्या बौद्धिक, शारीरिक व मानसिक क्षमतांचा पुरेपूर कस लागतो. व्यक्तीमध्ये उपजत असलेले काही गुण ज्यांचा विसर सगळ्यांना भौतिक सुबत्तेत पडला आहे त्या सर्व गुणांची उजळणी पदभ्रमण करतांना होते. आपल्यातील निसर्गप्रेमी, आत्मविश्वास, साहस, जिद्द, स्वयंपूर्णता, बंधुभाव, प्रसंगावधान, तडजोड, संकटाशी दोन हात करण्याची ताकद हे गुण हा छंद जोपासला तर वाढतच जातात. ज्यावेळी भेदभाव विसरून सगळे एकाच वाटेने, एकाच परिस्थितीत, एकच लक्ष प्राप्त करण्यासाठी चालत असतात त्यावेळी माणसाचा माणसाशी खरा सूरताल जुळतो. म्हणूनच नेहमी वाटतं की पदभ्रमण हा छंद माणसाचा जगण्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलवतो, निखळ माणूसपणाचा अर्थ अलगद शिकवून जातो.

पदभ्रमण, जंगलभ्रमण, गिरीभ्रमण, पर्वतारोहण व गडकिल्ले दर्शन असे अनेक निसर्ग भटकंतीचे प्रकार आहेत. आपल्या देशाला सह्याद्री, सातपुडा, हिमालय अश्या पर्वतरांगांची अमूल्य देणगी मिळाली आहे, तसेच अनेक अभायारण्ये त्यातील वनस्पती, पशु-पक्षी यांच्या अभ्यासाच्या उद्देशाने अनेक लोकांची भटकंती सुरु असते. आव्हानांची कमतरता नसलेल्या या भटकंतीत माणसाच्या क्षमतांचा विकास होतो व उत्साह द्विगुणीत होतो. पावसाळ्यात जंगलातील हिरवाईचे लावण्य, सूर्यास्ताच्या रंगेबिरंगी छटा, रिमझिम बरसणाऱ्या सरी, अवखळ धबधबे हे निसर्गाचे मनोहारी रूप पाहायला मिळते, तर हिवाळ्यात थंडीने गारठलेली रात्र अनुभवता येते, जंगलाचे सौंदर्य उन्हाळ्यातही विशेष असते मात्र विदर्भातील प्रखर ऊन भटकंती करण्यास योग्य नाही त्यामुळे उन्हाळ्यात विशेष कार्यक्रम घेतल्या जात नाही. फिरतांना वादळवारा, धुवाधार पाउस, कडक ऊन, कठीण वाट हे निसर्गाचे रौद्र रूप अनुभवतांना आपल्यातील सामंजस्य व प्रसंगावधान उपयोगात आणणे आवश्यक असते.

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेने माणसाला निसर्गाची व स्वतःची नीट ओळख व्हावी म्हणूनच या क्षेत्रात भरीव कार्यक्रम घेण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमांना युवापिढीसोबतच मनाने तरुण असलेले व अवघड वाटेने चालण्याची तयारी असलेले अनेक लोक उत्साहाने सहभागी झाले. या निमित्याने संस्थेशी अनेक नागरिक व विद्यार्थी जोडल्या गेले, या सर्वांना भटकंती सोबतच निसर्ग साक्षर करण्याचा पूर्ण प्रयत्न अनेक वर्षांपासून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी वेळोवेळी प्रामाणिकपणे केला. प्रत्येक कार्यक्रमानंतर सहभागी सदस्यांचा उत्साह द्विगुणीत होऊन अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया आल्या त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. महाराष्ट्रातील सातपुडा व सह्याद्रीच्या पर्वतरांगा येथील लोकांची गिर्यारोहणाची आवड पूर्ण करण्यासाठी मिळालेली अमूल्य देणगी आहे. या डोंगररांगा, खोल दऱ्या, कातळकडे, सुळके, घाट, अरण्ये त्यांच्या रूपाची मोहिनी घालून स्वतःकडे आकर्षित करत असतात. विशेषतः पावसाळा सुरु झाला की सुट्टीच्या दिवशी सिमेंटचे जंगल नकोसे वाटते, त्यामुळे भटक्यांचे पाय आपोआपच डोंगरांकडे वळतात. सह्याद्रीत तर किल्ल्यांमुळे गिर्यारोहणाला आगळेच महत्व प्राप्त झाले आहेत. ह्या सह्य कड्यांच्या मदतीने शिवरायांनी स्वराज्य स्थापनेचे अवघड कार्य सिद्धीस नेले. किल्ले फिरतांना त्याच्या संपूर्ण ऐतिहासिक माहितीसह फिरलात तर ऐतिहासिक पर्यटन घडेल व ह्या वास्तू म्हणजे आपल्या पूर्वजांची धारातीर्थे आहेत याची खात्री पटेल. एक मात्र लक्षात असावे की गिर्यारोहण करतांना पायात जोर व मनात निश्चय असणे अतिशय आवश्यक आहे.

अमरावतीच्या जवळ सातपुडा पर्वतरांगातील मेळघाट अभयारण्य म्हणजे विदर्भाचे नंदनवन. फेब्रुवारी ते मे पर्यंत विदर्भातील तापमान वाढलेलं असल्यामुळे पदभ्रमणासाठी योग्य वातावरण नसतं, त्यामुळे विदर्भात फक्त जुलै ते जानेवारी पर्यंत पदभ्रमण कार्यक्रमाचा आनंद घेऊ शकतो. चिखलदरा येथील गाविलगड किल्ला, अकोट जवळ असलेला नरनाळा किल्ला, कलालकुंड, धारखोरा, चीचाटी असे अनेक जंगलाच्या आतील धबधबे, सेमाडोह, कोलकाज, माखला, कुकरू असे मेळघाट अभयारण्यातील अनेक अंतर्गत मार्ग ट्रेकिंग साठी प्रसिद्ध आहेत. सध्या युवा वर्गात ट्रेकिंग कॅम्प व साहसी खेळांचे आकर्षण वाढते आहे .त्यामुळे संस्थेच्या साहसी कार्यक्रमांना अतिशय उत्तम प्रतिसाद

मिळतो. संस्थेने अमरावतीतील अनेक महाविद्यालयांशी असे निसर्ग पूरक कार्यक्रम परस्पर सहकार्याने घेण्याचा करार केला असून यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात युवावर्ग संस्थेशी जोडल्या जातो आहे. या कार्यक्रमातून जोडल्या गेलेले लोक संस्थेच्या इतर उपक्रमात देखील उत्साहात सहभागी होतात, त्यामुळे दिवसेंदिवस संस्थेची लोकप्रियता वाढते आहे. संस्था जिथे दरवर्षी निसर्ग भटकंती आयोजित करते अश्या मेळघाटातील काही निसर्गरम्य ठिकाणांवर शाब्दिक सफरीला जाऊन येऊया.

**गाविलगड व नरनाळा किल्लेभ्रमण**

सातपुड्यातील सुप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण चिखलदरा येथील गाविलगड किल्ला दर्शन कार्यक्रम संस्था दरवर्षी आयोजित करते तसेच अकोट जवळील नरनाळा किल्ला येथेही किल्ला दर्शन कार्यक्रम घेतल्या जातो. मेळघाट अभयारण्यातील गाविलगड व नरनाळा किल्ल्याचा इतिहास देखील रोचक आहे, हा भटकंतीच्या कार्यक्रमात संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर किल्ल्याची ऐतिहासिक माहिती सांगून सहभागींची जिज्ञासा देखील दूर करतात. चिखलदरा पर्यटन कार्यक्रमात लोकं किल्ल्याचे पहिले दोन दारं पाहिले की किल्ला पाहिला असं समजतात, पण आतपर्यंत चालत गेलात तर संपूर्ण किल्ला पाहिल्याचे समाधान मिळते. किल्ल्यातील वास्तू म्हणजे उत्कृष्ट स्थापत्यकलेचे नमुने असतात,



आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाने पावन झालेल्या या वास्तू म्हणजे आपली प्रेरणास्थाने होत याची जाणीव मात्र आपल्याला असायला हवी. गाविलगड किल्ल्यातील बांधकाम, दोन तलाव, तोफा, बुलंद दरवाजे, मंदिरे, सतीसमाधी पाहून त्याकाळी किल्ल्यावर असलेल्या राबत्याची कल्पना येते. नरनाळा किल्ला देखील उत्कृष्ट स्थापत्यकलेचा नमुना असलेल्या इमारतींनी व दरवाज्यांनी नटलेला आहे. आता हा भाग वनखात्याच्या अखत्यारीत असून येथे गाडीनेच जावे लागते मात्र आम्ही अनेकदा धारगड नरनाळा तसेच शहानुर नरनाळा चढलो आहोत. वनविभागाने आता येथील बोरी अभयारण्यात सफारी देखील सुरु केली असून शहानुरला राहण्याची उत्तम सोय असलेले संकुल देखील बांधले आहे. येथील अभयारण्यात अनेक प्राणी दिसतात, तसेच अनेक प्रकारच्या वृक्षसंपदेने व विविध पक्षांच्या अस्तित्वाने मेळघाटच्या जंगलाचे वैभव वाढले आहे. संस्थेच्या या दोन्ही कार्यक्रमात सहभागी होऊन विदर्भातील प्रसिद्ध असलेल्या दोन्ही किल्ल्यांचे दर्शन तुम्ही निश्चितच घेऊ शकता, संस्थेच्या उपक्रमात सर्वांचे सहर्ष स्वागतच असते.

**पावसाळ्यात खुणावतात वाटा धबधब्याच्या**

धारखोरा, चीचाटी, बेलकुंड तसेच कलालकुंड धबधबा हे मेळघाटातील रस्तेही निसर्गसौंदर्याने नखशिखांत नटलेले आहेत. पावसाळा सुरु झाला की डोळे डोंगराच्या धारेवरून दरीत कोसळणारे धबधबे बघण्यास आतुर होतात. येथे सर्वांना मुक्त कोसळणाऱ्या फेसाळत्या पाण्यात भिजण्याचा आनंद घेता येतो पण अर्थात सुरक्षित ठिकाणी व काही सूचनांचे पालन करावे लागते. कोणाला कुठलीही इजा होऊ नये या शुद्ध हेतूने या सूचना संस्थेतर्फे दिल्या जातात, त्यामुळे स्वसुरक्षेसाठी त्यांचे पालन करणे हिताचे असते. आयोजकांशी सहकार्याने वागले तर मुख्यतः पावसाळी तसेच सर्वच ऋतूतील पदभमण आनंददायी होतं. मेळघाट परिसरात असे अनेक मार्ग आपल्या प्रतीक्षेत आहेत ज्यावरील निसर्ग तुम्हाला नक्कीच मोहित करेल.



**धारखोरा**

सातपुड्याच्या कुशीतून कोसळतात मनोहारी जलधारा,
अनेक वर्षे सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवतोय धारखोरा. !

सातपुड्याच्या कुशीतील खळाळता धारखोरा मेळघाटातील लोकप्रिय धबधबा आहे. धारखोरा पदभ्रमण संस्था दरवर्षी आयोजित करते मात्र प्रत्येकवेळी जाण्याची इच्छा होतेच कारण दरवर्षी सृष्टी नव्या साजाने नटून आपले स्वागत करण्यास तयारच असते. अमरावती परतवाडा एक तासाचे अंतर पार झाले की परतवाडा सेमाडोह रस्त्यावर थोड्याच अंतरावर उजवीकडे बुरळघाट गाव दिसतं. गावात गाडी ठेऊन

चालायला सुरुवात केली की वाटेतील निसर्ग, सातपुड्याच्या पर्वतरांगा, झुळझुळ वाहणारे ओढे पाहून उत्साह वाढतो. आजकाल सर्वांचे कॅमेरे सज्ञ झालेले असतात, अद्वितीय निसर्गसौंदर्य नजरेत व कॅमेऱ्यात कैद करत वाट पुढे जात असते. काही ठिकाणी शेतातून वाट काढत, नाले ओलांडत आपण एका छोट्याश्या गावात पोहोचतो व येथूनच महाराष्ट्राची सीमा संपून आपला मध्यप्रदेशात प्रवेश होतो. मध्यप्रदेश आपले शेजारी राज्य, चालत राज्याची सीमा पार करण्याचा आनंद धारखोरा पदभ्रमणात आपल्याला मिळतो. पुढे पुढे रस्ता निमुळता होत जातो, पूर्ण वाट नदीतल्या दगडांवरून पार करावी लागते. दगड शेवाळलेले असल्यामुळे पाय अगदी जपून टाकणे फायद्याचे असते. बुट व कपडे ओले होण्याची काळजी न करता आनंद घेत चालत राहिलात तर मजा द्विगुणीत होते. खाऊ खाल्यावर कचरा जंगलात फेकू नये ही सक्त ताकीद संस्था सर्वांना सुरुवातीलाच देते, आम्ही अनेक पदभ्रमण कार्यक्रमात इतरांनी केलेला जंगलातील कचरा उचलून आणण्याचे कामही करतो. आजकाल अनेक पर्यावरणस्नेहींना पर्यटनस्थळ साफ करण्याचे कामही करावे लागते कारण जाणीव नसलेल्या मानवाचा स्पर्श झाला की निसर्गरम्य स्थळे खराब होतात.

रस्त्यात एका ठिकाणी दगडावर उभे राहिलात की सुमारे ३०० फुटावरून कोसळणारा धारखोरा अप्रतिम दिसतो. त्या ठिकाणी थांबून सगळे धबधब्याचे मनोहारी रूप नजरेत साठवून घेतात. आता मात्र मन अधीर होतं व कधी एकदा धबधब्याच्या खाली जातो असे वाटायला लागते. धारखोरा धबधब्याचे एक वैशिष्ट असे की या जलधारा जिथे कोसळतात तेथे दगड आहेत व जागा खोल नाही त्यामुळे धबधब्याखाली जाऊन बसणे शक्य आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला मात्र जाऊ नये कारण पाणी आपल्या सोबत माती, दगड घेऊन कोसळत असते व त्यामुळे जखमी होण्याची शक्यता असते. ऑगस्ट महिन्यात मात्र पावसाचा अंदाज घेवून कार्यक्रम आखता येतो. धारखोरा धबधब्याचा मनसोक्त आनंद घेवून जंगल अंधाराच्या आत पार करण्यासाठी परतीच्या वाटेला लागावे. धारखोरा एकदिवसीय पदभ्रमण असल्यामुळे सोबत जास्त सामानाची गरज नसते.

पहिले फक्त पदभ्रमण करणारे काही हौशी लोकच धारखोरा धबधब्याला भेट द्यायचे, मात्र आता पावसाळा सुरु झाला की सुट्टीच्या दिवशी खूप गर्दी असते. गर्दी कमी व गर्दी जास्त असे म्हंटले तर पर्यटकांवर अन्याय होईल, पण तेथील परिस्थिती पाहून हे म्हणण्याची वेळ निसर्गाबद्दल आस्था असलेल्या प्रत्येक व्यक्तीवर आली आहे. निसर्गाचे व्यसनच तर माणसाला बेधुंद करते तरी काही लोक वेगळेच व्यसन पूर्ण करण्यास अश्या स्थळांना भेटी देतात व वातावरण खराब करतात. काहींना तर अगदी पंचपक्वान्नाचे आयते जेवण अश्या ठिकाणी हवे असते. थर्माकोलच्या डिश, प्लास्टिकचे पेले सगळं कसं सोपं हवं, मग निसर्ग दुषित झाला तरी चालेल. लोकांच्या मानसिकतेपुढे हतबल होऊन खिन्न मनाने अशे काही दृश्य आम्हाला धारखोरा पदभ्रमण करतांना गेल्या काही वर्षात पाहावे लागले आहे. आपल्यासोबत सकाळी उठून करून घेतलेला पोळी भाजीचा डबा, प्रत्येकाच्या घरची वेगळी चव याची मजा आयत्या स्वयंपाकात नाही. पदभ्रमण करतांना काही गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे लागते, जसे आपले वागणे संयमित असावे, जंगलात कचरा करू नये, जास्त आवाज करू नये मात्र अतिउत्साहात या महत्वाच्या बाबींचा विचार लोक करतच नाही. निसर्गाप्रती आत्मीयता नसली की त्याची किंमतही नसते त्यामुळे लोक बेभान वागतात. लोकांचे वागणे पाहिले की वाईट वाटते. चांगल्या ग्रुप सोबत पदभ्रमण केले तर निसर्ग जपून पदभ्रमणाचा आनंद घेता येतो व निसर्गाप्रती असलेली आस्थाही जपता येते.



**चिचाटीचा धबधबा**

अचलपूर चिखलदरा मार्गावर अचलपूरपासून सुमारे २० कि.मी. अंतरावर चीचाटी गाव आहे. मेळघाटातील बागलिंगा ग्रामपंचायतीच्या हद्दीत चीचाटी गाव असून चिखलदरा तहसील अंतर्गत येते. धामणगाव गढी पासून पुढे गेलात की देवगाव मार्गावरून चीचाटी गावात पोहोचावे. गावातील शाळेत गाडी ठेवून पुढील मार्ग चालत जायचा असल्यामुळे आवश्यक सामाण व पिण्याचे पाणी सोबत घेवून निघावे. गावातील टुमदार घरांच्या मधून चालत गाव पार केले की नदी दिसते. नदी मागे ठेवून पुढे सीताफळाच्या झाडांमधून चालत आजूबाजूच्या परिसराची ओळख करून घ्यावी. रस्त्यातील झाडे, गवत, रानटी वनस्पती, इवलेसे पावसाळी किडे यांचे छायाचित्र काढण्यात व गप्पांमध्ये रमून आपला रस्ता एका मंदिराजवळ येऊन थांबतो. छत नसलेल्या मंदिराच्या मेहरपिवर बालकबाबा मंदिर असे लिहिले आहे. या मंदिराच्या समोर चालत गेलात की धबधब्याचे ओझरते दर्शन होते. पुढील मार्ग नदीतून, मोठाले दगड पार करून आपल्याला सरळ धबधब्याच्या जवळ नेतो. चालणे कमी असल्यामुळे कुटुंबासोबत आरामात सगळेच या धबधब्याला भेट देऊ शकतात. चीचाटीचा धबधबा पहायचा असल्यास ऑगस्ट व सप्टेंबर हे दोन महिने योग्य आहेत. येथील पाणी खूप काळ टिकून राहत नसल्यामुळे इतर वेळी धबधब्याला पाणी नसते. धबधबा दिसला की सगळ्यांचा उत्साह

अधिकच वाढतो परंतू पाण्याच्या ठिकाणी अंदाज घेवून पाय टाकणे अर्थातच काळजीपूर्वक वावर आवश्यक असतो. वन्यजीव व पर्यावरण संस्थेसोबत हा पावसाळी ट्रेक जरूर करावा.

**बाकादरी कलालकुंड**

सातपुड्याच्या कुशीत असे अनेक धबधबे आहेत ज्यांच्यापर्यंत ट्रेकिंग करीत पोहोचण्यास मन नेहमीच तयार असते, त्यातीलच एक बाकादरी कलालकुंड! अमरावतीवरून कलालकुंड धबधबा गाठायचा असल्यास चिखलदरा रस्त्यावरील आडनद या गावी पोहोचावे. गावात गाडी ठेवून पुढील रस्ता निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत चालायला सुरुवात करावी. वाटेत अनेकदा नदी पार करावी लागत असल्यामुळे पहिल्याच वेळी बुट ओले करावे म्हणजे बुटात लक्ष राहत नाही. जंगलातील रस्त्यावर दगडधोंडे, चिखलपाणी पार करत चालतांना जंगलाचा गंध, नीरव शांततेतील आवाज यांचा आस्वाद जरूर घ्यावा. विविध प्रकारच्या झाडांची ओळख, विशिष्ट प्रजातींचे गवत, रानफुले यांचे मनमुराद छायाचित्रे काढत चालत राहावे, आपली वाट एका अवघड कड्याजवळ येऊन थांबते. या ठिकाणी प्रथम धबधब्याचे दर्शन होते, खाली विस्तीर्ण कुंड आहे, पहिल्यांदा आलेल्या लोकांना वाटतं आला कलालकुंड धबधबा! मात्र या मार्गावर अनेकवेळा ट्रेकिंग केलेले अनुभवी लोक सोबत असले की ही गल्लत होत नाही. आम्ही पूर्वी या धबधब्याला जायचो तेंव्हा थोडा अवघड असलेला हा कडा चढून पार करावा लागायचा, मात्र आता तेथे लोखंडी शिडी लावली आहे. मागील पावसाळ्यात आम्ही गेलो तेंव्हा लक्षात आले की लोखंडी शिडी सोयीकरिता लावली पण शिडीच्या मधल्या पायऱ्याच गायब झाल्यामुळे आता शिडी पार करणेही साहसी खेळ झाला आहे. तुम्ही शिडी पार केली की अर्धी लढाई जिंकली. शिडीवरून चढून वर गेल्यावर वाहत्या पाण्यात पाय घालून बसण्याचा मोह होणे साहजिक आहे पण शेवाळलेले दगड असल्यामुळे तो मोह आवरून पुढे चालणे सुरु करावे. पर्यटकांच्या सुरक्षेची बरीच काळजी आता ट्रेकिंगच्या रस्त्यांवर घेतली असते मात्र पूर्वी आपली काळजी आपल्यालाच घ्यावी लागत असे. पुढे बराच वेळ चालत गेलात की डोंगराच्या आड अत्यंत सुंदर जलधारा कोसळतांना पाहून थकवा दूर पळून जातो. या धबधब्याचे हेच वैशिष्ट आहे की शेवटपर्यंत गेल्याशिवाय धबधबा दिसतच नाही. सकाळी चालायला सुरुवात केली की साधारणतः पोहोचण्यास दुपार होते. दुपारचे जेवण कलालकुंड धबधब्याच्या साक्षीने झाले की धबधब्याचे फोटो काढावे व त्याचे सौंदर्य फोटोच्या स्वरूपात कैद करावे. जंगल अंधाराच्या आधी पार करायचे असल्यामुळे पुन्हा आलेल्या वाटेने आडनद च्या दिशेने चालण्यास सुरुवात करावी. संध्याकाळी गावात पोहोचावे व सुखद आठवणींचा ठेवा घेवून गाडीत बसून घराची वाट जवळ करावी. एका दिवसात हा ट्रेक करून परत येता येतं. आम्ही  आम्ही फार पूर्वी कलालकुंडला तंबू लावून मुक्काम देखील केला आहे. आता मात्र वेळे अभावी एकदिवसीय ट्रेकिंगचे कार्यक्रमच जास्त आखल्या जातात. संस्था दरवर्षी बाकादारी कलालकुंड पदभ्रमण कार्यक्रम आयोजित करते.

**मेळघाटातील इतर निसर्गरम्य पदभ्रमण वाटा**

मेळघाटचे सृष्टीसौंदर्य सर्वच ऋतूत आपले वैशिष्ट्य राखून असले तरी पावसाळ्यात ते अधिकच खुलते. अश्या वातावरणात मेळघाटात फिरायला निघालात की अनेक ठिकाणी गाडीचे ब्रेक आपोआप लागतात व उतरून वातावरणाचा आस्वाद घेण्याची इच्छा कोणालाही आवरणे शक्य नसते. पावसाळ्यात सेमाडोहचे सिपनेचे पात्र पाण्याने ओसंडून वाहत असते, सेमाडोह येथील निवासी संकुलात मुक्कामाची उत्तम सोय असून दोन दिवसीय कार्यक्रम आखता येतो. येथून अनेक पदभमण वाटा आपल्या प्रतिक्षेत असतात. माखला सेमाडोह, सलोना सेमाडोह अश्या अनेक जंगलवाटांवर संस्थेतर्फे पदभ्रमण कार्यक्रम घेतल्या जातात.

सेमाडोह धारणी रस्त्यावर कोलकास या ठिकाणी सुद्धा राहण्याची उत्तम सोय असलेले संकुल आहे. कोलकासच्या वरच्या विश्राम गृहासमोरील दरी व दोन बाजूंनी वाहत येणाऱ्या नद्यांचा संगम पाहणे म्हणजे आनंद पर्वणी! थंडगार वारे, रिमझिम पाऊस, हिरवेगार जंगल, वाहते पाणी व उंची यामुळे येथील वातावरण अवर्णनीय असते. कोलकास वरून हरिसालला गेलात तर फोनचे सिग्नल मिळते इतर कुठेही फोन लागत नाही त्यामुळे हा परिसर निसर्गाचा आस्वाद घेण्यास अधिक चांगला असे वाटते. पावसाळ्यात रात्री येथे अचानक डोळ्यासमोर असंख्य काजवे चमकायला लागतात व आनंद द्विगुणीत होतो. पावसाळ्याच्या दिवसात जंगलात असंख्य काजव्यांनी केलेले स्वागत प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरते. या भागातील माखला, रंगुबेली, हरिसाल येथेही विश्रामगृह असून अत्यंत दर्शनीय स्थळी बांधले आहेत.

सेमाडोह वरून घटांगपर्यंत आल्यावर एक वाट कुकरू खामला कडे वळते. पावसाळ्यात या घाटात उंचीवर गेल्यावर इतके धुके असते की समोरचे काहीही दिसत नाही. प्रचंड वारा व धुके अनुभवायचे असेल तर कुकरूला नक्की जावे. कुकरू खामला मध्यप्रदेशात येते. प्रवेश, येथेही वनविभागाचे विश्रामगृह आहे. शंभरहून जास्त पवनचक्क्या येथील डोंगरावर आहेत. हा ट्रेक देखील संस्थेतर्फे आयोजित केल्या जातो. आपले नशीब की अमरावतीपासून केवळ शंभर किलोमीटरवर मेळघाटचे जंगल आहे. आपण अत्यंत कमी वेळात या निसर्गरम्य परिसरात पोहोचू शकतो म्हणूनच नेहमी वाटतं मेळघाट हे विदर्भाचे वैभव आहे. संस्थेतर्फे या निसर्ग वैभवाचे दर्शन घडविण्यासाठी अनेक कार्यक्रम घेतल्या जातात. निसर्गप्रेमी सर्वांनी नक्की पदभ्रमण कार्यक्रमात सहभागी व्हावे.



मा. आयुक्त प्रविणसिंह परदेशी व मा. आमदार यशोमतीताई ठाकुर यांच्या सोबत पक्षीनिरीक्षणावर चर्चा करतांना




संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या अमरावती जिल्हा पक्षीसुचीच्या दुसऱ्या आवृत्तीचे १७ व्या विदर्भ पक्षीमित्र संमेलन, वर्धा येथे प्रकाशित करण्यात आले.




डॉ. सालीम अली जन्मदिवसा निमित्त पक्षीनिरीक्षणाचे आयोजन



संस्थेच्या रानपिंगळा संशोधन प्रकल्पादरम्यान गुजरात मधील डांगच्या जंगलातील वेक्सची चमु



वन्यजीव सप्ताह दरम्यान संस्थेतर्फे पोहरा-मालखेड जंगलात निसर्गप्रेमींसाठी आयोजन भ्रमण




शालेय विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरिक्षण कार्यक्रम आयोजन



श्री सारवरकर यांच्या कडुन गावरान वान व स्थानीक बिजांची माहित जाणुन घेतांना वेक्सचे पदाधिकारी



संस्थेचे मुखपत्र रानवेध, प्रसिध्द अभिनेत्री अलका कुवल यांना भेट देतांना श्री. विद्यासागर देवके



छत्री तलाव येथे पक्षी गणनामध्ये सहभागी संस्थेचे पक्षीअभ्यासक



छत्री तलाव स्वच्छता अभियान मध्ये सहभाग



वेक्स व्याख्यानमाला अंतर्गत, BNHS चे डॉ. राजु कसंबे यांचे फुलपाखरांचे अद्‌भूत विश्व या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन



वनविभाग समवेत आयोजित जागतिक जैवविविधता दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन



जागतिक पर्यावरण दिवस २०१७ ला
शालेय विद्यार्थ्यांसाठी पक्षीनिरिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांकरिता वन्यजीव सप्ताहा दरम्यान अयोजित कार्यक्रमामध्ये संस्थेचे श्री किरण मोरे यांचे मार्गदर्शन




जागतिक पर्यावरण दिवस २०१९ ला
प्लास्टीक कचरा निर्मुलन कार्यक्रमाचे आयोजन



मेळघाट मध्ये रानपिंगळयाच्या संशोधन प्रकल्पा दरम्यान संस्थेची चमू




नैसर्गिक रंगातून चित्र रंगवा कार्यशाळेमध्ये मा. पालकमंत्री श्री. प्रविण पोटे यांना सविस्तर माहिती देतांना संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. अंजली देशमुख




Indian Bird Conservation नेटवर्क कार्याच्या मुल्यांकनासाठी आलेल्या केंम्ब्रीज विद्यापीठाच्या अभ्यासका ओडीसी यांची संस्थेस भेट.




संस्थेतर्फे आयोजित जागतिक व्याघ्र दिन कार्यक्रमाचे अचलपूर येथील जगदंबा महाविद्यालय येथे आयोजन




मातीचे गणपती बसवा कार्यशाळेमध्ये छोट्या मुलांना मार्गदर्शन करतांना संस्थेचे पदाधिकारी




प्रो. राजाभाऊ देशमुख आर्ट कॉलेज व विनायक महाविद्यालय नांदगांव खंडे. तर्फे आयोजीत वन्यजीव सप्ताह २०१८ कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना वेक्सचे पदाधिकारी




संस्थे तर्फे मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये राबविण्यात आलेल्या वनस्पती सनियंत्रण भुखंड अभ्यासासाठी संस्थेच्या चमूची क्षेत्रीय भेट.



श्री रामकृष्ण महाविद्यालय दारापूर, जि. अमरावती यांचेसोबत सामंजस्य करारादरम्यान संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर व महाविद्यालयाचे प्रा.डॉ. शितल तायडे इ.




BNHS च्या Common Bird Monitoring Program मध्ये सहभागी संस्थेचे पक्षी अभ्यासक




वेक्स तर्फे आयोजित २६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाची आयोजन चमु




वेक्स तर्फे आयोजित ११ व्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनाची आयोजन चमु



संस्थेचे पक्षीअभ्यासक श्री सौरभ जवंजाळ यांचे ३२ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन कराड येथे, घुवड प्रजातीवरील अभ्यासाचे सादरीकरण



मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वान अभयारण्यात रानपिंगळा संशोधन प्रकल्पादरम्यान संस्थेची चमू




जागतिक चिमणी दिन उपक्रमाचे उद्घाटन करतांना डॉ. मुर्तुझा अली सर



संस्थेतर्फे तयार करण्यात आलेल्या 'लार्क' या माहितीपटाच्या प्रदर्शनावेळी जमलेले अमरावती मधील पक्षी अभ्यासक



मातीचे गणपती बसवा २०१९ च्या यशस्वी आयोजना नंतर मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी व स्वयंम सेवकांची चमू



महात्मा फुले महाविद्यालय वरुड यांच्यासोबत सामंजस्य करार करतांना संस्थेचे पदाधिकारी

**जंगल भटकंती व संस्थेचे नियम**

वन्यजीव व पर्यावरण संस्था कुठल्याही कार्यक्रमात तथा उपक्रमात सहभागी प्रत्येक सदस्याची काळजी घेते, मात्र पदभमण करतांना सर्व सूचनांचे काटेकोर पालन करणे, अतिसाहस न करणे या गोष्टी आपल्याच फायद्याच्या असतात त्यामुळे त्यांचे पालन करणे अपेक्षित असते. अनेक अपघात हे केवळ निष्काळजीपणा व अतिसाहस यामुळे घडतात याचे सर्व जाणत्या लोकांना भान असावे. संपूर्ण काळजी घेतल्यावरही समजा आपत्ती आली तर परिस्थिती योग्य प्रकारे हाताळणे व अनुभवी माणसाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असते. आलेल्या परिस्थितीचा सामना सगळ्यांना एकत्रित येऊन करण्याची मनस्थिती तयार करूनच अश्या कार्यक्रमात सहभागी होणे अपेक्षित असते आहे.

स्वतःचे आवश्यक सामान घेऊन बूट घालूनच पदभ्रमण करावे. पाण्याचा वापर जपून करावा. सध्या सेल्फी घेण्याच्या नादात अनेक अपघात घडतात तेव्हा फोटो काढावे पण स्वतःला पहिले सांभाळावे. निसर्गाला हानिकारक होईल अशी कृती अपेक्षित नाही. कचरा, प्लास्टिक जंगलात टाकू नये, दिसलेच तर उचलून आणावे व त्याची योग्य विल्हेवाट लावावी. पावसाळी ट्रेक करतांना, तुम्ही काही बिया जमा केल्या असतील तर त्या रुजतील अश्या ठिकाणी टाकून निसर्गाला मदत करावी. काही ठिकाणी उजाड टेकड्यांवर वृक्षारोपण करू शकतो. स्थानिक लोकांशी संवाद साधावा, ट्रेकिंग ला जंगलात आत जातांना गावातून एखादा वाटाड्या सोबत असणे आवश्यक आहे कारण जंगलातील रस्त्यांची त्यांना संपूर्ण माहिती असते. या काही लहान लहान वाटणाऱ्या पण महत्वाच्या बाबी लेखात मुद्दामच नमूद केल्या आहेत. पदभ्रमण करण्यासाठी आपण उत्साहात असतो. हा उत्साह शेवट पर्यंत टिकावा व सुखद आठवणींचा ठेवा घेऊन परतीचा प्रवास व्हावा यासाठी ह्या सूचना पाळणे अत्यावश्यक आहे.



भौतिक सुखाच्या लालसेने मानवाकडून आधीच पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी झाली. त्यामुळे जगासमोर मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या पदभ्रमण मोहिमांमधून निसर्गाबद्दल प्रेम व आस्था असणारी पर्यावरणप्रेमी पिढी निर्माण व्हावी यासाठी संस्थांना नियमांचे पालन करणे सक्तीचे करावे. काही ठिकाणी सध्या केवळ गर्दी खेचण्यासाठी नियम शिथिल केल्याचे दिसून येते. आपण घराबाहेर जंगलात फिरायला जाणार या कल्पनेने उत्साह वाढतो पण अति उत्साहात काही धोकादायक ठिकाणी उगाच तरुण मुलांचे बळी गेल्याचे आपण सगळ्यांनी बातम्यांमधून वाचले व पाहिले आहे. अश्या घटनेने काही काळ समाजमन सुन्न होते पण त्याच चुका वारंवार होतांना दिसतात. पुढच्यास ठेच, मागचा हुशार ही केवळ म्हण नसून प्रत्येकाने अंगीकारावी अशी शिकवण आहे. आपल्याला साहित्य, कला, क्रीडाप्रकार अश्या अनेक माध्यमातून जीवन जगण्याची कला शिकण्याची संधी मिळते पण त्या संधीचे सोने तेव्हाच होते जेव्हा माणूस अनुभवी व विचारी होतो. साहसी क्रीडाप्रकार चांगले पण योग्य काळजी घेऊन केले तरच, अन्यथा उगाच या क्षेत्राची बदनामी होते. निसर्गाचे महत्व प्रत्येक व्यक्तीला कळावे आणि आजच्या स्पर्धेच्या युगात कुठेतरी क्षणभर शांतता अनुभवता यावी हा या पदभ्रमण मोहिमांचा मुख्य उद्देश आहे. चालणे हा सर्वांगसुंदर व्यायाम आहे आणि म्हणूनच आमच्या संस्थेसोबत पदभ्रमण हा सर्वांसाठीच आनंददायी अनुभव असेल यात शंका नाही. धन्यवाद.



*****

# पर्यावरण संवर्धन एक नैतीक जबाबदारी



**डॉ. श्रीकांत वऱ्हेकर**
उपाध्यक्ष
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था
अमरावती

सर्व भारतीय सण व समारंभ हे मुळात निसर्ग पर्यावरण व ऋतू संचालित बदलांना अनुसरूनच केले जातात. सण साजरे करण्याचा उद्देशच निसर्गाचे संवर्धन करणे व उत्सवांचे निसर्गाशी असलेले नाते समजून घेणे आहे. तसेच निसर्गाला देव मानणाऱ्या भारतीय संस्कृतीचा आदर करणे आणि तिला समजून घेणे आज गरजेचे झाले आहे. परंतू खेदाची बाब म्हणजे आज आपण सण साजरे करण्याचा नादान निसर्गाचा ऱ्हास करणे सुरू केले आहे. वाढती लोकसंख्या आणि बदलती मानसीकता याला कारणीभूत आहे. आनंदासाठी सण साजरा करण्याचा नादात आपण पर्यावरणाचा किती ऱ्हास करत आहोत हे विसरून जातो. दिवाळीमध्ये फटाक्यांमुळे होणारे ध्वनी प्रदुषण व वायू प्रदुषण, गणपती व दुर्गादेवी उत्सवांमध्ये होणारे ध्वनी व जल प्रदुषण, लग्न समारंभामध्ये होणारा बँड व डीजेचा आवाज, मंगल कार्यालयातून होणारे ध्वनी प्रदुषण तसेच वाया गेलेल्या अन्नाची विल्हेवाट न लागल्यामुळे पसरणारी दुर्गंधी अश्या कितीतरी समस्या कळते पण ही जबाबदारी माझी नसून शासनाची आहे या तोऱ्यात आपण वावरतो आणि सपशेल डोळे झाक करतो.

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था गेली अनेक वर्षापासून निसर्ग संवर्धनाचे काम करीत आहे. निसर्गाचे व समाजाचे आपले काही देणे लागते म्हणून मातीचे गणपती बसवा व निसर्गाशी बांधीलकी दाखवा कार्यक्रमाअंतर्गत विविध महाविद्यालयांमधुन निसर्ग सेवक तयार करून जनजागृती करत आहे. निसर्गभ्रमणासोबतच स्वच्छता मोहीम राबवित आहे. यामध्ये धबधबे,तलाव किल्ले येथे पर्यटकांनी टाकलेले प्लास्टीक व घनकचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्याचे काम बरेच वेळा केले आहे. जागतीक पर्यावरण दिवसा निमित्य वनविभागाव्दारे राबविण्यात आलेल्या प्लास्टीकमुक्त अभियाना अंतर्गत जनजागृती मोहीमेमध्ये प्लास्टीकमुक्त अभियाना अंतर्गत जनजागृती मोहीमेमध्ये वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सोबत घेवुन त्यांना प्लास्टीक प्रदुषणामुळे होणारे दुष्परिणाम समजावून सांगीतले व नैतीक जबाबदारीची जाण करून दिले.

मनुष्याला जगण्यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक स्त्रोतांमध्ये हवा व पाण्याचे अनन्य साधारण महत्व आहे. पण अति हव्यासामुळे आज ते प्रदुषित होत आहेत पृथ्वीतलावावर असणाऱ्या पाण्याच्या फक्त १% पाणी सर्व प्राणी व वनस्पती जननासाठी वापरण्यायोग्य आहे. परंतू आज पाण्याचा अतिवापर, पाण्याचे नसलेले व्यवस्थापन, इंडस्ट्रिजसाठी होणारा पाण्याचा वापर व त्यातून निघणारे प्रदुषित पाणी यामुळे पाणी प्रदुषणाची समस्या समोर येत असून पाण्यातील जैवविविता धोक्यात आली आहे. पाण्याविषयीची माहिती आपण थोडक्यात पाहू दरवर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी आपण २०% पाणी वापरू शकतो त्यापैकी ८% पाणी जमिनीमध्ये म्हणजे माती व मुरूमामध्ये मुरते तर १०-१२% पाणी दगडाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहचते त्याला आपण भुजल म्हणतो सुरूवातीला पाण्याचा उपसा मर्यादीत होता परंतू आज अमर्याद होणाऱ्या पाण्याच्या उपस्यामुळे पाण्याची जमिनीखाली खोली वाढली आहे. साधारणतः हा २५० फुट पर्यंतचे पाणी पावसामुळे पुन्हा भरू शकते ४०० ते ५०० फुटापर्यंतचे पाणी ५०० ते ४५०० वर्षापूर्वीचे असल्याचे (Nasa) नासा ला आढळले त्याला (Geological Water) असे म्हणतात महाराष्ट्रामध्ये पिण्याच्या पाण्याची आजही कमतरता आढळते दरवर्षी कितीतरी हजारो वस्त्या पाणी टंचाईग्रस्त असतात. पाण्याच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील लातुर मध्ये पाण्यासाठी होणाऱ्या भांडणाला नियंत्रीत करण्यासाठी सरकारने कलम १४४ लावली होती ज्यामध्ये पाण्याच्या स्त्रोत्रांजवळ लोक समुहामध्ये राहू शकत नव्हते.

गोदावरीचा जलस्त्रोत संपण्यावर आहे. ४० % कृष्णानदी आटण्याच्या मार्गावर आहे. गंगानदी आणखी किती दिवस बारा महिने राहील हेही सांगता येत नाही. १९८९ मध्ये २२ नद्या प्रदुषीत होत्या आज त्यांची संख्या ३०२ झाली आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा प्रत्येक नागरीकाला १०० लिटर पाणी मिळायचे आता ते फक्त २० लिटरवर पोहचले पाण्याशिवाय वनस्पती व पक्षांच्या जवळपास ८३ प्रजाती नष्ट झाल्या आहेत. UNESEF च्या सांगण्यानूसार २०४० पर्यंत ६० करोड मुलांना पिण्यासाठी योग्य पाणी मिळणार नाही उद्योग क्षेत्राला ३०% पाणी जास्त लागेल अशा वेळेस पाण्याची समस्या आणखी वाढेल. आज प्रदुषित पीण्याच्या पाण्यामुळे प्रत्येक २१ सेकंदाला एक बाळाचा मृत्यू होत आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे व निसर्गामध्ये झालेल्या बदलांमुळे गावातील शेतकरी शहराकडे वळला आहे हे थांबले पाहिजे. कारण आपणच याला जबाबदार आहोत निसर्गाने भरभरून दिलेले दान पुढच्या पिढीसाठी अबाधीत राहण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तेव्हा निसर्ग संवर्धन ही काळाची गरज आहे

*****

# पर्यावरण व वन्यजीव संवर्धनासाठी सामंजस्य करार



**प्रा.डॉ. गजानन वाघ**
कोषाध्यक्ष
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था
अमरावती

पर्यावरण व वन्यजीव संवर्धन क्षेत्रात आता एकोणीस वर्षे पूर्ण करून **'वेध'** आता ऑक्टोबर महिन्यात विसाव्या वर्षात पदार्पण करीत आहे या वीस वर्षाच्या वाटचालीमध्ये संस्थेने पर्यावरण,वन्यजीव व निसर्ग संवर्धनासाठी अनेक पर्यावरण विषयक उपक्रम राबविलेले आहेत आणि अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण विदर्भात पर्यावरण चळवळीला उभारी देण्याचे काम केलेले आहे.

पर्यावरण व वन्यजीव विषयक अनेक प्रकल्प संस्थेनी सुरू केलेले आहे आणि ते अव्याहतपणे चालु आहेत. शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आम्ही लक्ष करून या पर्यावरण चळवळीमध्ये त्यांना सहभागी केलेले आहे. अमरावती शहरातील तसेच जिल्ह्यातील अनेक शाळा, विद्यालय व महाविद्यालयांमध्ये पर्यावरण व वन्यजीव विषयक कार्यशाळा,सादरीकरण,निसर्ग भ्रमण आणि छायाचित्र प्रदर्शनी इ. द्वारे ही निसर्ग संवर्धनाची चळवळ समाजातील अनेक घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम विद्यार्थ्यांमार्फत चालु आहे. वेधच्या पर्यावरण विषयक चळवळीचा परिणाम म्हणून अनेक महाविद्यालयाचे सामंजस्य करारासाठी विनंती अर्ज संस्थेकडे आलेले असुन या महाविद्यालयांनी पर्यावरण व वन्यजीव चळवळीमध्ये वेध या संस्थेसोबत काम करण्याचे ठरविलेले आहे. अलीकडे National Assessment and Accreditation council (NAAC) म्हणजेच राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन (मान्यता) परिषद, बेंगलोर यांनी महाविद्यालयांच्या मुल्यांकन व प्रत्यायन प्रक्रियेत महाविद्यालयाचे (NGO) म्हणजेच अशासकीय संस्थेसोबत झालेले **सामंजस्य करार** (MOU) याला अधिक महत्व दिलेले आहे. अशी संस्था की जी पर्यावरण, निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनासाठी काम करीत आहे



**वेधसोबत खालील दिलेल्या महाविद्यालयांसोबत ' सामंजस्य ' करार (MOU) झालेला आहे.**

- प्राणीशास्त्र विभाग – श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावती.
- होमसायन्स विभाग – शासकिय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
- रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र व प्राणिशास्त्र विभाग,–
- ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय,अमरावती.
- प्राणिशास्त्र विभाग – भारतीय महाविद्यालय, अमरावती.
- प्राणिशास्त्र विभाग –विमलाबाई देशमुख महाविद्यालय,अमरावती.
- पर्यावरण विभाग–कला व वाणिज्य महाविद्यालय,
  किरण नगर,अमरावती.
- वनस्पती व पर्यावरण विभाग – महात्मा फुले महाविद्यालय,अमरावती
- भाषा विभाग – रामकृष्ण महाविद्यालय,दारापूर



**सामंजस्य करार (MOU) द्वारे वरील महाविद्यालय आणि वेध संस्था संयुक्तपणे खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्याचे ठरले आहे.**

१. पर्यावरण विषयक व्याख्यान, फिल्म शो आणि छायाचित्र प्रदर्शनी
२. जंगल भटकंती, पक्षी निरीक्षण, फुलपाखरू निरीक्षण, आणि गिर्यारोहण
३. जैवविविधता संबंधी अभ्यास व संकलन आणि संवर्धन
४. साप,पक्षी व इतर प्राण्यांची सुरक्षा व त्यांच्या बद्दल आलेले गैरसमजयावर माहितीपट दाखविणे
५. स्थानिक वनस्पतीचे माहिती आणि वृक्षारोपन कार्यक्रम
६. प्लास्टीक प्रदुषणसंबंधी जनजागृती कार्यक्रम व

माहितीपट दाखविणे

७. पर्यावरण,जैवविविधता व वन्यजीव यांच्या संबंधीत कार्यशाळा,परिषदेचे आयोजन

८. मातीचे गणपती बसवा व निसर्गाशी बांधीलकी दाखवा या संस्थेच्या उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग घेणे


९. परिसरातील ऐतिहासिक वारसांचे संवर्धन व जनजागृती कार्यक्रमात सहभागी होणे

१०. महाविद्यालयाच्या ' ग्रीन ऑडीट ' संबंधी चर्चा करणे

सध्या संस्थेकडे आणखी काही महाविद्यालयाचे सामंजस्य करार (MOU) साठी अर्ज आलेले आहे आणि येत्या काही दिवसात सुध्दा त्यांच्या सोबत (MOU) होणार आहे माझ्या मते वेक्ष चे अनेक महाविद्यालयांसोबत झालेले व होऊ घातलेले सामंजस्य करार खऱ्या अर्थाने वेक्षने गेल्या एकोणीस वर्षापासून पर्यावरण विषयक क्षेत्रात काम केल्याची ही पावतीच आहे.

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या मुख्य उद्देशांपैकी काही उद्देश खऱ्या अर्थाने अशा सामंजस्य करारा व्दारे पूर्ण होत आहेत याचा मला संस्थापक सदस्य या नात्याने आनंद होत आहे. संस्थेच्या यशस्वी वाटचालीला माझ्या मनपुर्वक शुभेच्छा.. !









*****

# माहीतीपटाची निर्मीती (एका डॉक्युमेंटरी च्या निमित्याने)



**किरण मोरे**
कार्यकारिणी सदस्य
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था
अमरावती

वेक्स (वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था ) मधे पक्षी अभ्यासक म्हणून काम करतांना आपण पक्षावर एखादी डॉक्युमेंटरी बनवायची हा विचार मी आणी निनाद अभंग ने अगोदरपासूनच केला होता पण एक चांगला विषय आम्हाला हवा होता. माळरानावरील पक्षी जीवनाबद्दल आम्हाला अधीक जिव्हाळा आणि त्यातील लार्क या प्रजाती बद्दल विशेष कुतूहल वाटायचे. आमची सुरवातही झाली ती साईक्स चंडोल पासूनच. जेव्हाही त्यांना बघायचो तेव्हा त्यांच्यात वेगळेपण भासायचे. असे वाटायचे कि यामध्ये उपप्रजाती सुध्दा असावी. त्यासाठी आम्ही त्यांचे फोटो, व्हिडीओ फुटेज घ्यायला सुरवात केली. नंतर कळले की वेगवेगळ्या दिसणाऱ्या या साईक्स चंडोल चे हे फ्रेश प्लमेज, वर्न प्लमेज, व्हेरी वर्न प्लमेज असतात. येथुनच लार्क पक्षी वर डॉक्युमेंटरी बनवायला सुरूवात केली. डॉ.जयंत वडतकर सरांना याबद्दल सांगितले तेव्हा त्यांना सुद्धा हि कल्पना आवडली व डॉक्युमेंटरी साठी त्यांनी पूर्णपणे सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शवली. त्यानुसार आम्ही कामी लागलो. आंम्हा दोघांजवळ ही Nikon D3200 कॅमेरा आणी 70-300 लेन्स होती. पक्षाचे व्हिडीओ फुटेज घेण्याच्या दृष्टीने हे अगदिच बेसिक Instrument. पण पूर्ण डॉक्युमेंटरी ची शूटिंग आम्ही याच Instrument ने सुरू केली. निनाद चा ॲनिमेशन फिल्म मधला अनुभव दांडगा असल्यामुळे फुटेज कसे घ्यायचे याची जाण त्याला चांगल्या तऱ्हेने होती. रोज सकाळी ६ वाजता आम्ही लार्क च्या शोधात निघायचो. मुख्यत:आम्ही Ashy crown finchlark, Indian bushlark व Sykes lark या तीन स्थानिक प्रजातींचा पाठपुरावा सुरू केला व जास्त भर लार्क च्या सवई व त्यांचे घरटे तयार करणे यावर भर दिला. त्यामधे चिमण चंडोल (Ashy-crown finchlark) ची घरटी खडकाळ व मुरमाड भागात जास्त आढळली. सप्टेंबर महिन्यात दिसलेल्या चिमण चंडोलच्या १३ घरट्यापैकी फक्त २ – ३ घरटी पिले मोठी होईपर्यंत तग धरू शकली होती. अमरावती मधील सावर्डी तलावाच्या काठावर सर्वात जास्त घरटी दिसून आली.

Indian bushlark ही प्रजाती सर्वत्र दिसायची पण तिच्या घरट्याचा मात्र थांगपत्ता लागायचा नाही. चोचीत खाद्य घेऊन ते या झाडावरून त्या झाडावर बसायची पण घरट्याकडे मात्र जांतांना दिसायची नाहीत . त्या दरम्यान त्यांचा Call, Courtship, Display, Foraging चे फुटेज चांगले मिळाले. पर्यायाने त्यांचा अभ्यास चांगल्या प्रकारे करता आला. Sykes lark चे बहुतांशी video फुटेज अमरावतीमधील जळका व छत्री तलाव परिसरात मिळाले. sykes lark च्या Display व टेरीटेरी मार्किंग मध्ये इतर पक्षांची नक्कल (इमिटेशन) करणे हे अनोखे असते. त्याचे घेतलेले फुटेज जेव्हा घरी जाऊन आम्ही बघायचो तेव्हा त्याच्या इमिटेशन मध्ये गवताळ माळरानातले बारा ते तेरा पक्षांच्या आवाजाचा समावेश दिसून यायचा. सलग २ महिने व्हिडिओ फुटेज घेतल्यानंतर आता त्याची एडिटिंग (एकत्रीकरण) ची पाळी होती. त्यानुसार आम्ही तीन प्रकारच्या लार्कवर थोडेफार भाष्य केले आहे. आणी जसे पक्षांना जे सर्वसामान्यपणे धोके असतात त्यापैकी गुरे चराई (Grazing) मुळे साईक्स चंडोलचे उध्वस्त झालेले घरटे, वाहन धडकेने मृत पावलेली लालपंखी चंडोल (Indian Bushlark) व M.I.D.C. च्या विस्तारीकरणात नष्ट झालेले चिमण चंडोल (Ashy-crown Finchlark) चे घरटे. या धोक्यामुळे तीनही लार्क चा झालेला शेवट आम्ही बघितला आणि तो या डॉक्युमेंटरी मध्ये दाखवण्याचा प्रयत्न केला. पण हे सर्व एडिट करणे सोपे काम नव्हते. आम्ही प्रत्येक सीन वर चर्चा करून ठरवायचो की कुठला सीन कुठे असावा.

एडिटिंग साठी After effect software वापरण्यात आले. निनाद ने सलग तीन महिने त्यावर काम करून व आपले Animation क्षेत्रातले कौशल्य पूर्णपणे पणाला लावून ३० मिनिटांची डॉक्युमेंटरी तयार केली. त्यासाठी त्याने आपली Animation महाविद्यालयातील प्राध्यापक पदाची नोकरीही सोडली. एडिटिंग नंतर स्क्रिप्ट (कथानक) तयार करणे गरजेचे होते. आणी स्क्रिप्ट साठी या लार्क वर आतापर्यंत जगात झालेला अभ्यास पाहणे आवश्यक होते. त्यासाठी डॉ. जयंत वडतकर सरांशी चर्चा केली व काही माहिती इंटरनेटवर शोधली पण बोटावर मोजण्या इतकेच Research paper (शोधनिबंध) सापडले व त्यातली माहितीही सर्वेक्षनापुरतीच मर्यादित होती. त्यामुळे या डॉक्यमेंटरी चे महत्व वाढले आणी आमची जबाबदारीही. स्क्रिप्ट पूर्णपणे इंग्रजीतच तयार केली. आता पाळी होती Narration (अनुवादक) आणी






संगीताची. अमरावती मधील स्टुडिओ मध्ये हा प्रयत्न करून पहिला तो चांगला जमलासुद्धा. परंतू लार्कवरील डॉक्युमेंटरी ला Discovery, National Geographic सारखा फील हवा होता. कारण आम्हांला ती International Environment Festival मध्ये पाठवायची असल्यामुळे तांत्रिक दृष्टीने मजबूत असने आवश्यक होते. शिवाय महाराष्ट्रात लार्क प्रजातीवर बनलेली ही पहिलीच डॉक्युमेंटरी असल्यामुळे सुद्धा. तिचा दर्जा उत्तम ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतो दरम्यानच्या काळात आम्ही २–३ संगीतकाराकडे सुध्दा झालेले काम दाखविले. पण मनाजोगते काम झाले नाही. मग निनाद ने Narration आणी Music साठी थेट मुंबईच्या Sash स्टुडीओशी संपर्क केला. तेथील तंत्रज्ञ मंडळीनी डॉक्युमेंटरी पाहून त्यामध्ये काम करण्यास सहमती दर्शवली. आणि मग डॉक्यमेंटरी साठी तो निवेदक मिळाला ज्याने National Geographic साठी निवेदन केले आहे.

पार्श्वसंगीत (background sound) त्यांनी दिले ज्यांनी ४ महीन्या अगोदर आलेल्या 'हाफ' तिकीट' या मराठी चित्रपटाला संगीत दिले होते. पण हे सगळे जुळवून आणण्यासाठी निनाद ला studio मध्ये चार महिन्यात बऱ्याच फेऱ्या माराव्या लागल्या. त्यांना दृश्या मधले बारकावे समजावून द्यावे लागले. Trial music (संगीताची चाचणी) बरेच वेळा पसंत नापसंत केल्या गेले. तेव्हा कुठे एक उत्कृष्ट संगीत व आवाज डॉक्युमेंटरी ला मिळाला.


डॉक्युमेंटरी च्या निमीत्ताने आम्ही विदर्भातील अकोला, वाशीम, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली व अमरावती या जिल्ह्यामध्ये फिरलो. सप्टेंम्बर–२०१५ ला सुरु केलेला हा आमचा प्रयत्न सप्टेंम्बर–१६ ला पूर्ण पूर्ण झाला. या एक वर्षाच्या काळात बऱ्याच अडचणी आल्या पण पक्षी आणी पक्षाचा अभ्यास या आमच्या छंदामुळे आम्ही अडचणीवर मात करू शकलो. मी, निनाद आणी वडतकर सरांनी तयार केलेल्या aab production (all about bird) च्या बॅनरखाली व वेक्स च्या सहकार्याने या डॉक्युमेंटरी ची निर्मिती झाली आहे.

सध्या ही फिल्म युटयूबवर उपलब्ध असून तिचे मराठीमध्ये भाषांतर करून पुन्हा एकदा ती नव्याने उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. आपण ती फिल्म एकदा जरूर बघावी व आमचा प्रयत्न कितपत यशस्वी झाला ते आम्हास कळवावे.





# माझ्या छायाचित्रणाचा प्रवास



**श्री. युवराज गुर्जर**
अ/२४, विश्वजीत सोसायटी,
वीर सावरकर मार्ग,
नौपाडा, ठाणे - ४००६०२.
मोबाईल नं.९८९२१-३८३३८

आमच्या सोसायटीतच एक गरूडाचे पिल्लू पडायचे निमित्त झाले आणि तेंव्हापासुनच माझी निसर्ग निरिक्षणाची सुरवात झाली. १९८७ साली ते कावळ्यांनी जखमी केलेल पिल्लू मला आमच्या सोसायटीतील पक्षी तज्ञांनी सलिम अलींच्या पुस्तकात मला दाखवले आणि तेंव्हा पासूनच माझ्या जंगलतल्या वाऱ्या सुरू झाल्या त्या आजतागायत. माझी सुरवात अर्थातच अशी पक्षी निरीक्षणाने झाली.कॉमर्स कॉलेजला असल्यामुळे तसा वेळ भरपुर मिळायचा त्यामुळे पक्ष्यांवर सतत वाचन आणि जवळपासच्या जंगलांना, ठिकाणांना भेटी सुरू झाल्या.बी.एन.एच.एस.,डब्लू.डब्लू.एफ़. निसर्ग मित्र अश्या संस्थांचा सभासद झाल्यामुळे त्यांच्या बरोबर अनेक जंगलात निसर्ग शिबिरात सहभागी झालो. अर्थातच त्यावेळेस कॉलेजमधे असल्यामुळे आणि सध्या सारखे सहज कॅमेरे मिळणे शक्य नसल्यामुळे छायाचित्रण करणे म्हणजे केवळ एक स्वप्न होते.

सतत वाचन आणि जंगलातल्या भेटींमुळे पक्षीनिरिक्षणात थोडाफार तरबेज झालो. यानंतर असाच एकदा पावसाळ्यात येऊरच्या जंगलात फिरत असताना झाडावर एक भलेमोठे फुलपाखरू दिसले. आधी मला ते खोटे आणि प्लॅस्टीकचे वाटले कारण त्याचा आकारच एक फुटा एवढा मोठा होता.थोडे अधिक जवळ जाउन बारकाईने बघीतले तेव्हा जाणवले की ते एक फुलपाकरू नसून ती दोन फुलपाखरांची मिलन जोडी होती आणि हळूहळू हलतही होती. डोळ्यावर विश्वास बसत नव्हता पण जे बघत होतो ते नक्कीच सत्य होते.आम्ही हळूच त्या जोडीला सॅक मधून घरी आणले आणि एका मोठ्या काचेच्या रिकाम्या फिशटँक मधे ठेवले.आता ते फुलपाखरू कुठले आहे ते ओळखण्यासाठी माझी धडपड सुरू झाली. त्यावेळी भारतीय फुलपाखरांवर पुस्तके उपलब्ध नव्हती आणि इंटरनेटचाही प्रसार आपल्याकडे झाला नव्हता.बऱ्याच शोधाअंती बी.एन.एच.एस चे श्री.आयझॅक किहीमकर यांचे तज्ञ म्हणून नाव कळले आणि त्यांना फोन केला. फोनवरच्या त्या माझ्या फुलपाखराच्या वर्णनावरूनच ते प्रचंड उत्साहीत झाले आणि त्यांनी सांगीतले की ते फुलपाखरू नसून ऍटलासमॉथ हा पतंग आहे आणि तो जगातला सर्वात मोठा पतंग म्हणून गणला जातो. याशीवाय मुंबईमधे बऱ्याच वर्षांच्या काळानंतर तो परत दिसला आहे. त्वरीत स्वत: आयझॅक किहीमकर आणि त्यांचे मित्र सुधीरप्रेम माझ्याकडे आले आणि त्यांनी छायाचित्रे घेतली. मधल्या काळात नर पतंग मरून गेला आणि मादी पतंगाने गुलबटरंगाची ज्वारीच्या दाण्या एवढी १०० एक अंडी घातली. या पतंगांना तोंडाचे अवयवच नसतात आणि प्रौढ अवस्थेमधे फक्त जोडीदार मिळवून मिलन घडल्यावत पुढचा वंश वाढवणे हे एकच काम त्यांना असते. त्यामुळे नर ७/८दिवसात मरतात तर मादी पुढे अंडी घालून लगेच मरते. या काळात अळी असतानी त्यांनी खाल्लेले अन्न त्यांच्या शरीरात चरबीच्या स्वरूपात साठवलेले असते त्यावर त्यांची गुजराण होते. या प्रकारानंतर माझा फुलपाखरांचा अभ्यास सुरू झाला. पक्षी निरीक्षणा बरोबर हा अजुनच एक वेगळा आनंद होता.अगदी आपल्या घराच्या आसपास, बागांमधे अनेक जातींची, रंगीबेरंगी फुलपाखरे दिसतात पण आपल्याला त्यांच्या बद्द्ल काहीच माहिती नसते. ही ईवलीशी फुलपाखरे हजारो किलोमीटर स्थलांतर करतात, काही विषारी फुलपाखरे असतात आणि त्यांची नक्कल करणारी बिनविषारी फुलपाखरे सुद्धा असतात हे सर्व काही नविन होते. अर्थात भारतीय जातींवर पुस्तके नसल्यामुळे अनेक परदेशी पुस्तकांवरूनच माहिती मिळवली आणि ज्या जाती त्यांच्याकडे आणि आपल्याकडे सुद्धा दिसतात त्यांची थोडीफार ओळख झाली. याच प्रयत्नातून, अभ्यासातून फुलपाखरांवर छान किती दिसते हे १९९४ मधे पुस्तक लिहीले. बहुतेक ते मराठीत फुलपाखरांवर खास असलेले पहिलेच पुस्तक असावे. त्याचप्रमाणे आज इंटरनेटच्या जगात, ब्लॉग संस्कृतीत माझा मराठी मधला फुलपाखरांचा ब्लॉग हा त्यावेळी जगातला एकमेव मराठीतला ब्लॉग होता.

साधारणत: २५/३० वर्षांपुर्वि वन्यजीव छायाचित्रण करणारे मोजकेच छायाचित्रकार होते. त्यावेळी छायाचित्रण व्हायचे ते फक्त लग्न, मुंज अश्या समारंभात नाही तर चित्रपट आणि जाहिरातींचे व्यावसायिक छायाचित्रण. त्या काळात Nikon चा SLR बघायाला मिळणे मुश्किल तर स्वत: बाळगायची तर गोष्टच सोडा. अभ्यासा बरोबरच मधल्या काळात बरीच काटकसर करून निकॉनचा फिल्म कॅमेरा आणि लेन्स विकत घेतली होती आणी छायाचित्रं सुरू केले होते.जंगलांना भेटी देण्याचे सत्र तर सुरूच होते.अनुभव घेत घेत शीकत होतो पण बऱ्याच वेळेस लेन्सेस ची आणि इतर सामानाची कमतरता सतत जाणवत असायची. आता पर्यंत एक जाणवले होते, मोठ्या प्राण्या पक्ष्यांवर बरेच संशोधन झाले होते, त्यांचे छायाचित्रण सुद्धा बरेच झाले आहे पण निसर्गातल्या किटक आणि इतर छोट्याश्या घटकांकडे मात्र कायम दुर्लक्ष झालेले आहे. या एकमेव कारणाकरता मी ठरवले की आता निसर्गात फक्त मॅक्रो छायाचित्रण करायचे. आता कॅमेरातर आला होता पण छोट्या जीवांचे छायाचित्रण करण्यासाठी लागणारी मॅक्रोलेन्स मिळणे आणि परवडणे हे केवळ अशक्य होते. मग त्यातल्या त्यात कसे काय जवळून छायाचित्रण करता येइल याचा अभ्यास सुरू झाला आणि क्लोज अप फिल्टरची माहिती कळली. हे क्लोज अप फिल्टरस म्हणजे आपल्या कडे असलेल्या लेन्सवर फिरकीने बसणारे भिंग. या लेन्स किट मधे ३ किंवा

४ फिल्टरस असतात. +२, +४, +१० अशी त्यांची पॉवर असते. आपल्याला किटक छायाचित्रात जेवढा मोठा दाखवायचा असेल तेवढा मोठ्या पॉवरचा फिल्टर वापरायचा. जेमतेम ७००/८०० रुपयामधे हा किट मिळायचा. यात किटक जास्त मोठा दाखवायचा असेल तर एकावर एक असे दोन फिल्टर सुद्धा लावता येतात. या फिल्टरचा तोटा म्हणजे छायाचित्राच्या कडा या vignette व्हायच्या. पुर्वी छायाचित्रे फोटो स्टूडीओमधून प्रिंट करून मिळायची. त्यामुळे तिथे आपल्याला काही कमी अधिक बदल करता यायचे नाहित. आता डिजीटल कॅमेराच्या जमान्यामधे मात्र आपण हे फिल्टर वापरल्या नंतर vignette होऊ नयेत म्हणून आपण त्याच्या कडा आधिच क्लीक करू शकतो. त्यामुळे ह्या क्लोज अप फिल्टरचा सगळा तोटा आपल्याला सहज टाळता येतो.

काही वर्षे ही क्लोज अप फिल्टरस वापरल्यानंतर त्यांच्या पेक्षा काही तरी अजून नविन आंइ जास्त्र प्रभावी मॅक्रो चे साधन वापरावे असे वाटू लागले. थोडी फार माहिती करून घेतल्यावर एक्स्टेंशन ट्युब बद्दल कळले. या एक्स्टेंशन ट्युबचा ३ ट्युब चा संच असतो. यातील एक एक्स्टेंशन ट्युब कॅमेरा आणि आपल्या लेन्सच्या मधे बसवायला लागते. या एक्स्टेंशन ट्युब १४ ाा, २० ाा आणि ३६ ाा या आकारात साधारणत: मिळतात आणि यातली कुठली एक किंवा अनेक एक्स्टेंशन ट्युब एकावेळी आपण वापरू शकतो. आपल्या कॅमेऱ्याची किट लेन्स किंवा ५० ाा ची लेन्स या एक्स्टेंशन ट्युब बरोबर वापरणे सर्वात उत्तम आणि प्रभावी ठरते. आपल्याकडे असलेल्या लेन्स चे मिनिमम फोकसिंग अंतर या एक्स्टेंशन ट्युबमुळे एकदम कमी होऊन जाते आणि तुम्हाला तुमच्या किटकाच्या किंवा फुलाच्या अगदी जवळ जाऊन त्याचे छायाचित्रण करता येते. या एक्स्टेंशन ट्युब च्या मध्ये कुठल्याही प्रकारची लेन्स नसल्यामुळे छायाचित्रातील प्रतिमा अगदी स्पष्ट असते. मात्र याच वेळी कॅमेरा आणि लेन्स मध्ये अजून एक एक्स्टेंशन ट्युब अधिक आल्यामुळे प्रकाश थोडासा कमी होतो. अर्थात मी कायमच फ्लॅश वापरत आल्यामुळे मला हा अडथळा कधिच जाणवला नाही. या एक्स्टेंशन ट्युब च्या मुळे अगदी लहान म्हणजे फुलपाखरांच्या अंड्यांचीसुद्धा छायाचित्रे मला सहज घेता आली. यानंतर मात्र आता थेट मॅक्रो लेन्सच घ्यायची असा विचार केला. अर्थातच त्याहीवेळी निकॉन ची मॅक्रो लेन्स परवडण्यासारखी नव्हती. त्यामुळे टॅमरॉन कंपनीची ९० ाा ची मॅक्रो लेन्स घेतली आणि छायाचित्रण सुरू केले. ही लेन्स खिशाला परवडण्यासारखी तर होतीच पण या लेन्समुळे छायाचित्र अगदी करकरीत शार्प यायचे. या लेन्सने काढलेल्या छायाचित्रांना अनेक भारतीय आणि भारताबाहेरच्या छायाचित्रण स्पर्धेमधे बक्षिसे मिळाली. या मॅक्रो लेन्सने काढलेल्या छायाचित्रातील किटकाची प्रतिमा अजून मोठी दिसावी म्हणून मी या ९० ाा मॅक्रो लेन्सबरोबर एक्स्टेंशन ट्युबसुद्धा वापरू लागलो. यामुळे छायाचित्रात किटक भलताच मोठा दिसायला लागला. अशीच काही वर्षे ९० ाा ची मॅक्रो लेन्स वापरल्यावर मी टॅमरॉन कंपनीची १८०ाा ची मॅक्रो लेन्स घेतली. या लेन्समुळे मला फुलपाखरांची किंवा उडणाऱ्या किटकांची छायाचित्र जास्त लांबून घेता यायची. सापांच्या किंवा बेडकांच्या करता तर ही लेन्स उत्तम वापरता येत होती. त्यांना अजिबात लक्षात न येता अगदी लांबूनच त्यांचे छायाचित्रण साध्य होत होते आणि ते माझ्याकरता सुद्धा सुरक्षीत ठरत होते. मात्र या काळात तठ हे नविन तंत्रज्ञान विकसीत झाले ज्यामुळे शरीराची कंपने ज्यामुळे छायाचित्र हलण्याची संभावना वाढते ती एकदम कमी होऊन जाते. अर्थातच या नविन तंत्रज्ञानाचा फायदा घ्यायचा ठरवून मी टॅमरॉन कंपनीची ९० ाा ची VC (Vibration Copensation) मॅक्रो लेन्स घेतली. माझ्या दर रवीवारच्या फेऱ्या कायम येऊर, नागला, कर्नाळा, फणसाड इथे होत असतात. या लहान लहान जंगलात पण दरवेळेस हमखास न चुकता काहीना काही छान दिसतच रहाते आणि अनेक अविस्मरणीय अनुभव सुद्धा येतात. ज्या फुलपाखरांची आम्ही तासन तास वाटबघता ती फुलपाखरे चक्क माझ्या कॅमेरावर, हातावरच येउन अनेकदा बसली आहेत. कित्येक वेळा सापांची, विंचवांची अचानक गाठ पडली आहे. ह्या छोट्या छोट्या जंगालातील ह्या सुक्ष्म बारीक किटकांच्या माझ्या छायाचित्रांना आतापर्यंत देशात,

परदेशात जास्त प्रसीद्धी मिळाली आहे. यासाठी मी भारताचे प्रतीनीधीत्व केले आहे याचा मला सार्थ अभिमान सुद्धा आहे. दरवेळेस लहान किंवा मोठ्या जंगलात जाताना डोक्यात एखाद्या छायाचित्राची फ्रेम अगदी पक्की तयार असते पण दरवेळेस ते छायाचित्र मिळतेच असे नाही. आता वाघीण अगदी लहान बछड्यांबरोबर बघणे याची मी गेली१०/१२ वर्षे वाट बघतोय पण हा योग अजुन काही आला नाही. मजेची बाब अशी की माझ्याच बरोबरच्या एकास्नेह्यांना असेच एक वाघीण आणि तीची ३ लहान लहान पिल्ले असे अगदी त्यांच्या जीपच्या अगदी समोरच दिसले पण ते त्या वाघांना बघण्यात एवढे गुंगून गेले की त्यांनी एकही छायाचित्र घेतले नाही.

आपल्याकडचा बिबळ्या मी इतक्या वेळेस दिवसा आणि रात्री एकेकटा, जोडीने बघीतला आहे पण अगदी आता पर्यंत त्याचे चांगले छायाचित्र माझ्याकडे नव्हते. आता मात्र बेरा किंवा झालना सारख्या जंगलामधील त्यांची छायाचित्रे माझ्याकडे आहेत. असेच काहीसे मॅक्रो छायाचित्रणाचे असते, जंगलात कधी काय कुठे दिसेल याचा नेम नसतो आणि त्यामुळेच माझ्या पुढच्या प्रत्येक जंगल भेटीचा तो एक मुख्य अजेंडा कायम असतो आणि त्या ओढीनेच मी कायम जंगलात जात रहातो.

*****

# वाईल्ड लाईफ फोटोग्राफी आणि रोजगार



**प्रा.डॉ. गजानन वाघ**
कोषाध्यक्ष
वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था
अमरावती

वाईल्ड लाईफ फोटोग्राफी अर्थात वन्यजीव छायाचित्रण म्हणजे नेमके काय तर जंगलात भटकत असतांना जंगली पशु–पक्ष्यांची, विविध प्रकारच्या किडयांची व दुर्मिळ वनस्पतींची केलेली फोटोग्राफी म्हणजेच वाईल्ड लाईफ फोटोग्राफी होय. यामध्ये still फोटोग्राफी म्हणजे स्थिर छायाचित्रण व चल छायाचित्रण अर्थात Videography या दोन्ही प्रकारांचा समावेश करता येईल. वाईल्ड लाईफ फोटोग्राफीसाठी विविध साधनांची आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने कॅमेरा, लेन्सेस,फ्लॅशगन, फिल्टर्स, ट्रायपॉड स्टँड, बॅटरी बॅक–अप, एक्स्ट्रा मेमरी कार्ड, कॅमेरा बॅगज् इत्यादींचा समावेश करता येईल. विशेषत: यामधे कॅमेरा सारख्या गोष्टींची निवड अतिशय महत्वाची आहे, कारण कॅमेरा या क्षेत्राचा आत्मा आहे. निकॉन, कॅनॉन यासारख्या नामवंत कंपनीच्या कॅमेराला वाईल्ड लाईफ फोटोग्राफरकडुन पसंती दिली जाते.



**कॅमेरा (Camera)** :– वाईल्ड लाईफ फोटोग्राफीसाठी कॅमेराची निवड अतिशय महत्वाची आहे. कॅमेराची निवड सर्व साधारणपणे तीनप्रकारे करता येईल. १) Under Water Camera २) DSLR Camera ३) Point and Shoot Camera प्रोफेशनल फोटोग्राफर आणि वाईल्ड लाईफ फोटोग्राफर पसंती देतात ते DSLR कॅमेरालाच. DSLR म्हणजे Digital Single Lens Reflex Camera होय. या कॅमेराची बॉडी वजनदार असते तसेच विविध प्रकारचे आवश्यकतेनुसार त्याला लेन्सेस लावल्या जावु शकतात.

DSLR कॅमेरा घेतांना एल.सी.डी. स्क्रीन साईज, अॅटोमॅटीक फोकसींग पॉईट, आय.एस.ओ. आणि मेगापिक्सेलस् या गोष्टी महत्वाच्या ठरतात. त्याचसोबत आपले आर्थिक बजेट किती आहे ते सुध्दा महत्वाचे ठरते. कारण DSLR कॅमेराची किंमत ही रू. ३०,०००/– पासुन तर रू. १०,००,०००/– पर्यत आहे. या क्षेत्रात तसेच फोटोग्राफीसाठी वापरण्यात येत असलेली विविध प्रकारची लेन्सेस व त्यांचा योग्य वेळी वापर याला सुध्दा अनन्य साधारण महत्व आहे

**लेन्सेस** (Lenses) :–वाईल्ड लाईफ फोटोग्राफीसाठी विविध प्रकारच्या लेन्सेसची आवश्यकता भासते. त्यामध्ये Wide Angle Lenses, Fixed or Prime Lenses, Telephoto or Zoom Lenses and Macro Lenses or Micro Lenses इत्यादींचा समावेश होतो. लॅन्डस्केप फोटोग्राफी करायची असल्यास प्रामुख्याने Wide Angle Lenses or Standard Lenses चा वापर केल्या जातो. आणि सोबत फिल्टर लावल्यास छायाचित्रांची सुस्पष्टता अधिक वाढते. पक्षांची व जंगली प्राण्यांची फोटोग्राफी करावयाची असल्यास Telephoto or Zoom Lenses, Fixed or Prime Lenses चा वापर केल्या जातो. कारण या लेन्सेसची 'Focal Length' जास्त असते. त्यामुळे छायाचित्राची सुस्पष्टता वाढते. त्याचबरोबर किटक, स्पायडर, वनस्पतींची फुले, पाने तस्सम अशा छोटया गोष्टींच्या फोटोग्राफीकरीता आपण Micro Lence कॅमेराला लावू शकतो.

त्याचसोबत छायाचित्रांची गुणवत्ता अधिकाधिक वाढविण्यासाठी आणखी काही साहित्यांचा वापर करावा लागतो. विशेष म्हणजे वाईल्ड लाईफ फोटोग्राफीकरीता अनेक पुरक साधनांची आवश्यकता असते. यामध्ये ट्रायपॉड स्टँड, मोनोपॉड स्टँड यासारखी साधने फोटोमधील स्पष्टता अधिका अधिक वाढवू शकतात. याव्यतिरिक्त या क्षेत्रात तसेच फोटोग्राफीसाठी वापरण्यात येत असलेली विविध प्रकारची लेन्सेस व त्यांचा योग्य वेळी वापर याला अनन्य साधारण महत्व आहे फ्लॅशगन, फिल्टर्स यांच्यामुळे फोटो दर्जेदार मिळू शकतो. UV, CPL, FLD and ND Filters असे बाजारामध्ये अनेक प्रकारचे फिल्टर्स उपलब्ध आहेत. असे विविध प्रकारचे फिल्टर्स डिजीटल फोटोग्राफीसाठी उपयुक्त ठरत असुन जास्तीचा प्रकाश रोखण्यास तसेच छायाचित्राला अधिक गडद रंग देण्यास मदत करते. त्याचसोबत लेन्सच्या काचाला संरक्षण सुध्दा मिळते. DSLR कॅमेरे आणि आवश्यक असणाऱ्या लेन्सेसचे वजन थोडे जास्त असणे, त्यामुळे

त्यांना व्यवस्थितपणे हाताळण्यासाठी अनेक प्रकारच्या कॅमेरा बॅग बाजारामध्ये उपलब्ध आहेत. छायाचित्रकार त्यांच्या आवश्यकतेनुसार वेगवेगळया कंपनीच्या बॅगांना पंसती दर्शवितात.

याशिवाय हे लेन्स योग्यप्रकारे सांभाळण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या Lences बॅगचा वापर तसेच जंगलात असतांना पावसापासुन साहित्यांचे संरक्षण करण्यासाठी Water Proof Cover चा वापर अतिशय आवश्यक आहे. आदी गोष्टींमुळे बुरशीसारख्या जीवाणूंचा कॅमेरा व लेन्सेसवर होणारा घातक परिणाम टाळू शकतो.

जंगलामध्ये मुक्कामी राहुन सतत काही दिवस फोटोग्राफी करावयाची असेल तर त्यासाठी Extra Camera Battery, Extra Memory Card and Charger यासारख्या गोष्टी वाईल्ड लाईफ फोटोग्राफीसाठी महत्वाच्या ठरतात. या क्षेत्रात काम करायचे असल्यास जंगलात पायदळ चालण्याची तसेच भटकंती करण्याची तयारी, फोटोग्राफीसाठी लागणारे सर्व साहित्य स्वत:हुन वाहुन नेण्याची शारीरिक क्षमता असायला पाहिजे. शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या व्यायामाची गरज असते. श्वासावर संपुर्ण नियंत्रण ठेवणे, न हालता कॅमेरा हातावर बराच वेळ तोलुन धरणे या गोष्टीला फोटोग्राफीमध्ये अतिशय महत्व आहे. गिर्यारोहणाची सवय अथवा प्रशिक्षण घेतले असल्यास वाईल्ड लाईफ फोटोग्राफी साठी अधिक उपयोगी ठरू शकते.

या क्षेत्रात काम करीत असतांना विविध प्रकारच्या जंगलांची संपुर्ण माहिती ठेवावी लागते तसेच तेथे असलेल्या पशु–पक्ष्यांची, त्यांच्या अधिवासांची, त्यांच्या हालचालींची, त्यांच्या वैशिष्टयपुर्ण आवाजांचा अभ्यास आवश्यक ठरते. यासारख्या अनेक पुरक गोष्टींची माहिती वाईल्ड लाईफ फोटोग्राफीमध्ये एक वेगळेपण जपण्यास मदत मिळते. त्याचप्रमाणे जंगलाला जुळतीमिळती वेशभुषा ठेवणे, स्थानिक भाषेचे ज्ञान आत्मसात करणे, स्थानिक लोकांसोबत बोलण्याचे तंत्र, त्यांच्यात मिसळण्याचा स्वभाव यासारख्या बाबी जंगलात भटकंती करतांना उपयोगी पडतात.



या क्षेत्रात काम करावयाची ईच्छा असल्यास फोटोग्राफीचे पायाभूत ज्ञान संपादन करणे व तांत्रिक बाबींची माहिती करून घेणे आवश्यक आहे. त्याकरीता एखाद्या फोटोग्राफीचा Foundation Courses पुर्ण करता येईल. सध्या अनेक संस्थांमार्फत अशाप्रकारचे Career Oriented Courses/ Professional Courses चालविले जातात. या व्यतिरिक्त काही खाजगी संस्थांमार्फत पार्टटाईम कोर्सेस आयोजीत केले जातात. या अभ्यासक्रमात सर्टीफिकेट, डिप्लोमा व डिग्री यासारखे कोर्सेस उपलब्ध आहेत.

जगात वन्यजीवांसाठी भारत देश प्रसिध्द आहे. भारतीय वाघ, सिंह, गेंडा, स्नो लेपर्ड व तसेच विविध जातींचे पक्षी यांनी भारतीय भूभाग संपन्न आहे. भारतीय वाघ व भारतीय जंगले तर अनेक परदेशी पर्यटकांचे आकर्षण आहे. हिमालय, ईस्टर्न घाट, वेस्टर्न घाट, राजस्थानचे वाळवंट, सातपुडयांच्या पर्वतरांगा, लांबच लांब समुद्री किनारे आदींनी आपली वेगळी जैवविविधता जपलेली आहे. यामुळेच भारतात वाईल्ड लाईफ फोटोग्राफी या क्षेत्रात करीयर करण्याची उत्तम संधी आहे. तसेच या क्षेत्रात रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. जंगलात मनसोक्त भटकणे, जंगली प्राण्यांचे, पक्ष्यांचे फोटो काढणे हे सर्व आतापर्यत छंद म्हणुनच अनेकांना माहित होतं, पण हा छंद सुदधा एक उत्तम करिअर होवु शकते, नव्हे तर त्यातुन चांगली मिळकत पण होवु शकते. Naturalist, Free lances Photographer, Resource Person, Tour Leader, Tour Guide या सारख्यांना स्वयंरोजगाराच्या स्ध्दा संधी आहेत. तसेच Wildlife Tourism Agency, Environment साठी काम करण्याऱ्या अनेक N.G.O., Advertisement Agencies, Documentary Film बनविणाऱ्या एजेंसीज् यामध्ये रोजगाराला भरपूर वाव आहे. पण या सर्वासाठी वन्यजीव क्षेत्राचा पुरेसा अनुभव असणे गरजेचे आहे. अनुभवानुसार या क्षेत्रात दहा हजारापासुन तर पन्नास हजारापर्यत दर महिन्याला कमाई होवु शकते. तसेच उत्तम दर्जाच्या छायाचित्रांना पुस्तकांसाठी, मॅगझीनसाठी भरपूर मागणी असते व त्याचा मोबदला सुध्दा चांगला मिळतो.

वन्यजीव छायाचित्रकार दुर्मिळ प्राण्यांचे, वनस्पतींचे, पक्ष्यांचे छायाचित्रण करीत असतात, त्यामुळेच ही छायाचित्रे उपलब्ध होवुन व त्याव्दारे त्यांची माहिती आपल्याला होत असते. अशा छायाचित्रणातुन बरेचदा नवीन प्राण्यांचे शोध/नोंदी घेतल्या जातात व आपल्या ज्ञानात भर पडत असते. वन्यजीव छायाचित्रांच्या प्रदर्शनीमुळे समाजातील सर्वच घटकांना वन्यजीवांची ओळख होवुन जनजागृती व पर्यायाने त्याचे संवर्धन केल्या जावु शकते.



# पक्षीछायाचित्रण - तथ्य, आव्हाने आणि उपयोगीता



**श्री. मनोज बिंड**
वन्यजीव छायाचित्रकार
अमरावती

एकदा का छंद म्हणून फोटोग्राफी करायची ठरवली की, फोटोग्राफीची आकर्षक आणि आव्हानात्मक शाखा म्हणून वन्यजीव छायाचित्रण आणि त्यातल्या त्यात पक्षीछायाचित्रणाकडे मन ओढ घेते. त्याला कारणही तसेच आहे, या छायाचित्रणाकरीता आवश्यक असणारा विषय 'पक्षी' सुदैवाने आजतरी आपल्या आसपासच उपलब्ध आहे. किंवा गाव शहरापासून थोडीशी लांब पदयात्रा करण्याची तयारी असली की मग खऱ्या अर्थाने 'रान मोकळच . खिसा थोडा हलका करण्याची तयारी असेल तर सध्याचं तंत्रज्ञान एवढं झपाट्याने अद्यावत होत आहे की, केवळ जुजबी तांत्रीक माहितीच्या व कॅमेराच्या आधारे चांगले पक्षिछायाचित्रण करता येते असा एक (गैर) समज दुदैवाने रूढ होऊ पाहत आहे.

छायाचित्रणाकरीता पक्षी तसा सहज उपलब्ध होणारा जीव आहे. त्यामुळे उच्च दर्जाची साधने वापरून या प्रकारचे छायाचित्रण करणे सोपे आहे असे प्रथम दर्शनी वाटत असले तरी ते तेवढे सहजसाध्य नाही हे लक्षात घ्यावे लागेल.

नितांत सुंदर निसर्ग, त्यातील आकर्षक विविध घटक आणि नित्य नवे अविष्कार कॅमेराबध्द करण्याचा मोह कुणालाही होईल. या निसर्गाचाच एक घटक पक्षी. पक्ष्यांबद्दल मानवी मनाला असलेले आकर्षण खुप पुरातन आहे. विविध रंगसंगती, आकर्षक पंख, विविध आकार, मंजुळ स्वर यांची छायाचित्रकारासोबतच सामान्यांना सुध्दा मोहीनी पडतेच. महत्वाचे म्हणजे अन्य कहस्त्र वन्यपशुप्रमाणे मानवी जीवाला हानी पोहोचवू शकेल अशी कुठलीच नैसगीक यंत्रणा यांच्याकडे नसते. यामुळे पक्षीछायाीचत्रण तसे सोईस्कर वाटत असले तरी छायाचित्रणातील ईतर आव्हाने मात्र तेवढीच परीक्षा बघणारी असतात.



कॅमेरा उत्कृष्ट छायाचित्र निर्माण करत नाही तर कॅमेरामागील व्यक्ती ते करते या आशयाचा वाकप्रचार प्रसिध्द आहे. महागडा कॅमेरा, लेन्स या सारखी अद्यावत आणि खर्चीक साधने आवश्यक आहेतच आणण ती विकत घेणे ही एकवेळ शक्य होईल परंतु छायाचित्राचा 'चांगले ते विलोभनिय' असा प्रवास हा योग्य तंत्र आत्मसात केल्याशिवाय, आवश्यक अभ्यास केल्याशिवाय आणि पराकोटीचा संयम बाळगल्याशिवाय पुर्ण होऊ शकत नाही. तंत्र, अभ्यास आणि संयम ही त्रिसुत्री अगदी गाठीशी बांधून ठेवावी लागते. चांगली छायाचित्रे काढणे हा या प्रवासातील अगदीच प्राथमिक टप्पा आहे. पक्षी सहज मिळतो म्हणून दिसला पक्षी की कर क्लिक ही वृत्ती तुम्हाला केवळ छायाचित्र मिळवून देवू शकते, 'उत्तम' छायाचित्राचे समाधान मात्र नाही. इथे सरळसरळ एका दुसऱ्या सजीवाची संबंध येतो म्हटल्यावर त्याचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. पक्ष्यांच्या दिनचर्येचा आणि सवयीचा निरिक्षण वजा अभ्यास करावा लागतो. पक्षी केव्हा जागे होतात ? केव्हा चिवचिवाट करतात ? अन्न कोठे आणी केव्हा शोधतात ? त्याचे खादय कोणते ? त्यांचा विणीचा हंगाम कोणता ? यासारख्या प्रश्नांची उकल निरिक्षण आणी अभ्यास याव्दारेच करता येईल. कारण तुमच्या परिसरात किंवा तुम्ही ज्या परिसरात छायाचित्रणाला जाल त्या परिसरात साधारणत: कोणते पक्षी आढळतात या माहितीवरच तुमचे यश अवलंबून असते. याकरीताच छायाचित्रणाचे स्थान कोणते याचा ही जुजबी अभ्यास असावा लागतो. याप्रकारच्या छायाचित्रणाकरीता वैज्ञाणीक दृष्टीकोनातुन फ्लॅशचा वापर करणे योग्य नसल्यामुळे त्या ठिकाणी नैसगीक प्रकाश किती व केव्हा येतो याचा अंदाज येण्याकरीता तसेच आवश्यक तो योग्य अँगल मिळवण्यासाठी त्या परिसराला वारंवार भेटी दयाव्या लागतात.

आतापर्यंत आपण प्रत्यक्ष छायाचित्रणाला सुरवातच केली नाही, ही पुर्वतयारी आहे. अत्यावश्यक साधने म्हणजे कॅमेरा, लेन्स, आवश्यक त्या ठिकाणी ट्रायपॉड घेऊन आपण नियोजीत ठिकाणी गेलो की खरी परीक्षा सुरू होते. आपला विषय एक सजीव आहे. त्याचा स्वत:च्या सवयी, भावभावना, मुड, आणण महत्वाचे म्हणजे भीती सुध्दा आहे. त्यामुळे तुम्ही सज्ज असलात तरी तो तुम्हाला हवे तसे फोटो घेऊ देईलच यांची खात्री नसते. नेमक्यावेळी तो जागा बदलवेल, ऊडून दूर निघून जाईल किंवा भितीमुळे तुमच्या जवळपासही फिरकणार नाही. इथे दुसरी परिक्षा सुरू होते ती तुमच्या संयमाची आतापर्यंत सुरळीत सुरू असणा-या या प्रवासात नेमक्या याच परिक्षेत नापास होणाऱ्यांचं प्रमाण सर्वाधीक आहे, याबाबत आश्चर्य वाटायला नको. लगेच फोटो मिळाला नाही म्हणून संयम न सोडता शांतपणे वाट बघत बसणे, दिवसभर सुध्दा कधीकधी कित्येक महिने, वर्ष सतत प्रयत्न करावे लागतात तेवढी चिकाटी अंगी बाळगणा-याचेच हे क्षेत्र

आहे. फोटो मिळत नाही म्हणून पक्षयाचा पाठलाग सुध्दा करण्याचा प्रयत्न बरेचजण करतात. यात फारसे चुकीचे काही नसले तरी अप्रतिम फोटो पाठलाग करून नाही तर त्या पक्ष्याच्या कलाने घेऊन, त्याच्या मनातील भिती आपल्या संयम वर्तणूकीने दुर करूनच काढता येतात, असा नावाजलेल्या वन्यजीव छायाचित्रकारांचा आजवरचा अनुभव आहे. विणीच्या हंगामात नर पक्ष्यांच्या बाहय रंगरूपात खुपच आकर्षक आणण नाविन्यपुर्ण बदल होतात आणि ते टिपण्यासाठी त्यांच्या या कालावधीची जाण ठेवावी लागते आणि वाटही बघावी लागते. कक्षी पक्षी आपल्या कलाने वागत नाहीत, कधी ठिकाण आपल्या सोईचे नसते तरी कधी प्रकाश योग्य साथ देत नाही. या सर्व अडचणींची अग्निपरिक्षा झाल्यावरच काही क्षण, प्रसंग असे लाभतात की एक चांगले **’मनोवेधक’** छायाचित्र मिळते.

पक्षिछायाचित्रण हा विषयक मुळात आकर्षक आहे, मनाला प्रसन्नता आणणारा आहे. त्यामुळे या छंदाचा आपल्या जीवनावर विशिष्ट आणी सकारात्मक असा प्रभाव निश्चित पडतो. पक्षी किलबिलाट करीत भल्यापहाटे अन्न शोधार्थ घरटयाबाहेर पडतात आणि सकाळचा सौम्य प्रकाश तसेच सायंकाळच्या संधीप्रकाशाआधीचा काही काळ हा छायाचित्रणाला आदर्श ठरतो. साहजिकच यासाठी कुठलाही कंटाळा न करता सकाळी किंवा सायंकाळी पायपिट करणे, निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवणे ही सवय आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत लाभदायी ठरते. एकाग्रता आणि संयम अंगी बाणवला जातो, त्यामुळे उत्तम मानसिक आरोग्य लाभते. या दगदगीच्या जीवनात हे शारीरीक व मानसिक लाभ बहुमुल्य ठरतात. हा वैयक्तिक लाभ तर आहेच पण या सततच्या प्रयत्न आणि निरिक्षणातुन पक्ष्यांची ओळख व्हायला सुरवात होते. ठराविक परिसरातील त्यांची सदयस्थिती , संख्या यांची माहिती होते. स्थानिक पक्षी तसेच स्थलांतरीत पक्षी कोणते ? त्यांचे स्थलांतरण कोणत्या प्रकारचे आहे ? स्थानिक की आंतरराष्ट्रीय? या प्रकारची माहिती हळूहळू संकलीत होत जाते. पक्ष्यांचा जीवनक्रम , वस्तीस्थाने, अन्नसाखळी इत्यादीबाबतचा हा सचित्र व सुत्रबध्द माहीतीपट अनेक पक्षीअभ्यासक, निरिक्षक आणण संशोधक यांना अत्यंत उपयोगाचा ठरतो. या क्षेत्रात काम करणा–या सेवाभावी संघटना, अनुदानीत संघटना तसेच शासकीय यंत्रणा यांना सदर माहिती पक्ष्यांच्या संवर्धन व सुरक्षिततेच्या उपाययोजनांची आखणी व अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच भविष्यकालीन आढावा घेण्याच्या दृष्टीने पुरक ठरते.

अशा प्रकारे सुयोग्य व नियोजनबध्द पक्षीछायाचित्रण आपल्याला आत्मीक आनंदासोबतच निसगाचे ऋण फेडण्याची संधी सुध्दा उपलबध्द करून देतो. त्यामुळे थोडासा खर्च, बराचसा अभ्यास आणि पराकोटीचा संयम या भांडवलावर आपले जगणे सुंदर करणारा हा छंद जोपासायला काहीच हरकत नाही.

*****

## मनोज बिंड यांना एफआयपीची पदवी जाहीर



फेडरेशन ऑफ इंडीयन फोटोग्राफी (एफआयपी) या छायाचित्रण क्षेत्रातील मध्यवर्ती संस्थेतर्फे अमरावती शहरातील निसर्ग छायाचित्रकार मनोज बिंड यांना **आर्टिस्ट** ही मानाची पदवी जाहीर केली आहे. मनोज बिंड हे सन २०१२ पासून निसर्ग छायाचित्रण करतात, तर ऑक्टोबर २०१८ पासून त्यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यास सुरूवात केली. या अत्यल्प कालावधीत त्यांनी फेडरेशन ऑफ इंडीयन फोटोग्राफीच्या स्पर्धांमध्ये पाच सुवर्ण पदके आणि फ्रांस हे मुख्यालय असलेल्या फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल आर्ट फोटोग्राफी ( एफआयएपी) ची मान्यता असलेल्या स्पर्धांमध्ये चार सुवर्णपदके पटकावली. या कामगीरीच्या आधारे जुलै २०१९ च्या अहवानुसार त्यांना एफआयएपी पदवी जाहीर झाली आहे हा बहुमान पटकाविणारे ते विदर्भात पहिले छायाचित्रकार आहेत.भारतासह फ्रांस ,ग्रीस, इंग्लंड, स्कॉटलंड, अर्जेंटिना, तुर्की, इराण, नेपाळ यांसारख्या १३ देशांतील स्पर्धा व प्रदर्शनात त्यांची छायाचित्रे उल्लेखनीय व बक्षिसपात्र ठरली आहेत. मॉस्को रशिया येथील वेबसाईटने सन २०१८ मध्ये सर्वोत्तम १०० जागतिक छायाचित्रकारांमधून त्यांचा समावेश ७० व्या स्थानी केला आहे.



# वेक्स तर्फे पक्षी महोत्सवाचे आयोजन

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, गेल्या १७ वर्षापासून पक्षी अभ्यास, नोंदणी, संवर्धन व जनजागृतीसाठी कार्य करीत असून या अंतर्गत शालेय तथा महविद्यालयीन विध्यार्थ्यांकारिता पक्षी निरीक्षणाचे कार्यक्रम आयोजित करीत असते. हिवाळ्या दरम्यान आपल्या भागात जवळपास ४०–५० प्रजातींचे स्थलांतरित पक्षी देश–विदेशातून येत असतात, छत्री तलावावर सुद्धा मोठ्या संख्येने, युरोप तथा उत्तरेकडील अनेक देशातून पक्षी प्रजाती मोठ्या प्रमाणात येत असतात. या पक्ष्यांची व एकूणच पक्षी विश्वाची ओळख करून देण्याच्या दृष्टीने दरवर्षी संस्थेत अमरावती लगतच्या छत्री तलावावर वेक्स बर्ड फेस्टचे आयोजन करण्यात येत असते. या ठिकाणी पक्षी निरीक्षणास येणाऱ्या विध्यार्थी तथा निसर्गप्रमींसाठी पक्षी निरीक्षनाकरिता दुर्बीण तथा माहितगार स्वयंसेवकाच्या मदतीने तलावावर आलेल्या स्थलांतरित पक्षी प्रजातींची ओळख तथा पक्षी निरीक्षण करता येते. तसेच याठिकाणी संस्थेतर्फे पक्षी निरीक्षण करण्याकरिता दुर्बिणी, पक्षी विषयक पुस्तके, पक्षी निरीक्षणास लागणारे इतर साहित्य, कॅमेरे, लपण गृह, पक्षी सूची ई. साहित्य प्रदर्शनार्थ ठेवण्यात येते. तसेच शालेय विध्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धाही घेण्यात येते. या स्पर्धेच्या विजेत्यांना स्मुतीचिन्ह, पुस्तके व प्रमाणपत्र, संस्थेच्या पुढील कार्यक्रमा मध्ये प्रदान करण्यात येतात. या कार्यक्रमामध्ये शालेय तथा महाविद्यालयीन विद्यार्थी, व निसर्ग प्रेमी मोठ्या संख्येने भाग घेतात. या कार्यक्रमातील सहभाग हा विनामूल्य असतो.











*****

## जागतिक चिमणी दिनानिमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन

दरवर्षी वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेतर्फे २० मार्च या जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. या अंतर्गत चिमणी गणना,चिमण्यांच्या कृत्रिम घरटयाचे प्रदर्शन व वाटप,पाण्याच्या भांड्याचे वाटप,व्याख्याने,स्लाईड शोज व जनजागृती असे विविध उपक्रम राबविले जातात कार्यक्रमांचे संस्थेतर्फे प्लायवुड पासून तयार करण्यात आलेली आकर्षक कृत्रिम घरटी,मातीची पाण्याची भांडी इत्यादींचे प्रदर्शन व वितरण यासाठी गाडगेनगर येथे संस्थेतर्फे स्टॉल लावण्यात येत असतो कार्यक्रमांचे समन्वयक **श्री. सौरभ जवंजाळ ,** संस्थेचे पदाधिकारी,सदस्य व स्वयंसेवक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतात














*****

# 'सकाळ' वृत्तपत्रामधिल पर्यावरणपूरक गणेशोत्सव बाबत प्रकाशित लेख

## निसर्गाशी बांधीलकी जपा


डॉ. जयंत वडतकर

गणेशोत्सवादरम्यान होणाऱ्या विविध प्रदूषणाबाबत अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर चर्चा होतात. विविध संस्था याबाबत जनजागृतीसाठी कार्य करीत असतात. गणेशमूर्ती विसर्जनासाठी अमरावती शहरातील छत्री व वडाळी तलाव ही सर्वांच्या आवडीची ठिकाणे, त्याद्वारे होणारे प्रदूषण लक्षात घेता अमरावतीतील काही पर्यावरणप्रेमी संस्था, प्रशासन व महापालिकेने सन २००३ मध्ये छत्री व वडाळी तलावांत विसर्जन होऊ नये म्हणून प्रयत्न सुरू केले. विसर्जनासाठी पर्याय म्हणून वडाळीजवळच्या खाणीच्या खड्ड्यात प्रथमेश तलावाची निर्मिती केली गेली. तरीही या तलावात व शहरातील पडिक वा वापरात असलेल्या विहिरींमध्ये विसर्जन होतच होते. आजही होत आहे. प्लास्टरच्या गणेशमूर्ती, त्यांचे रासायनिक रंग, निर्माल्य, थर्माकोल आदींमुळे होणाऱ्या प्रदूषणाला अंकुश लावण्यासाठी आम्ही प्रयत्नरत असतानाच प्लास्टरच्या ऐवजी मातीच्या मूर्ती बसवा.. पाण्याचे प्रदूषण होऊ देऊ नका.. याबाबत जनजागृती अभियान सुरू केले. हे काम करीत असतानाच "आम्हालाही मातीची मूर्ती बसविणे आवडेल; परंतु उपलब्ध होत नाही" असा सूर अनेकांकडून ऐकण्यास मिळाला. तेव्हा मातीच्या मूर्ती उपलब्ध करून देता येतील काय, असा विचार करतानाच "मातीचे गणपती बसवा : निसर्गाशी बांधीलकी दाखवा" या उपक्रमाला २००५ मध्ये सुरुवात झाली. वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या अध्यक्ष डॉ. प्रभा भोगावकर, सचिव डॉ. जयंत वडतकर, प्रा. डॉ. अंजली देशमुख, डॉ. संजीवनी व संजय गणोरकर, प्रा. डॉ. मंजूषा वाठ, प्रा. डॉ. मालती गायकवाड, प्रा. डॉ. गजानन वाघ, प्रकाश लढ्ढा आदींनी या वेळी पुढाकार घेऊन सदरच्या अभियानांतर्गत मातीच्या मूर्ती बनविणे, पाणीमिश्रित नैसर्गिक रंगांनी रंगविणे या विषयावर कार्यशाळा, स्लाइड शो, प्रदर्शन, पत्रके आदींच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. मातीच्या मूर्तीचे महत्त्व तसेच प्लास्टर ऑफ पॅरिस व रासायनिक रंगांचे दुष्परिणाम लक्षात आणून देण्याबाबत जनजागृतिपर कार्यक्रम राबविण्यात आले. सन २००५ मध्ये नेहरू मैदानात मातीच्या गणेशमूर्तींचा स्टॉल लावण्यात आला अन्‌ विशेष म्हणजे पहिल्याच दिवशी दुपारपर्यंत सर्व मूर्ती विकल्या गेल्या. ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविण्यात येणारा हा उपक्रम संस्था गत १२ वर्षांपासून दरवर्षी नवनवीन उपक्रमांची भर घालून राबवीत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या उपक्रमास अमरावतीकरांकडून मोठा प्रतिसाद लाभत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

■ डॉ. जयंत वडतकर,
सचिव, वेक्स तथा मानद वन्यजीवसंरक्षक.

## जलाशयातील परिसंस्था, जैवविविधतेचे संरक्षण आवश्यक


प्रा. गजानन वाघ

श्रावण महिना म्हटला की आपल्या चहूबाजूंनी हिरवळ पसरलेली असते. कधी पाऊस कधी ऊन यामुळे आर्द्रता निर्माण होते. वनस्पतींची भरपूर वाढ होऊन त्यांना सुंदर असा फुलोरा येतो. याच महिन्यात अनेक उत्सवांची मांदियाळी सुरू होते. हरितालिका, गणेशोत्सव, नवरात्र यांसारख्या सणांच्या उत्सवांमध्ये आपण बेल, आंबा, शमी यांसारख्या अनेक वनस्पतींची पाने व फांद्या अक्षरशः ओरबाडून आणतो. किंबहुना अनेक वनस्पतींना पूर्णतः संपवतो. अलीकडे तर याला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झालेले आहे. प्राणी व प्रजातींना धोका निर्माण झालेला आहे. सोबतच ग्लोबल वॉर्मिंगसारख्या संकटाला आपण आमंत्रण देत आहोत.

या सणांदरम्यान मोठ्या प्रमाणात घरगुती विधींद्वारा व सार्वजनिक स्तरावर भरपूर प्रमाणात निर्माल्य व इतर पूजासाहित्य जमा होते. हे निर्माल्य मूर्तींच्या विसर्जनासोबतच आपण विहिरी, नदीनाले आणि तलावांसारख्या ठिकाणी सोडतो. प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनविलेल्या मूर्ती व त्यांच्यातील कृत्रिम रंगांमधून अनेक रासायनिक घटकांचे व विघटन न होणाऱ्या घटकांचे प्रमाण पाण्यात वाढते. त्यामुळे तेथील पाणी विषारी होऊन जलाशयातील वनस्पती, शंख, शिंपले, मासे, पक्षी व अनेक सूक्ष्म जीवजंतूंचा शिरकाव होऊन त्याचा घातक परिणाम त्यांच्या जीवनकार्यावर होतो.

मोठ्या प्रमाणात जलाशयात निर्माल्य जमा झाल्यामुळे तेथे बॅक्टेरियाचे प्रमाण वाढते आणि पाण्यातील ऑक्सिजन कमी होऊन पाण्याला काळसर रंग येतो. पाण्याला विशिष्ट वास यायला लागतो. पुट्रीफिकेशन ही प्रक्रिया सुरू व्हायला लागते. अशा प्रकारामुळे आपल्या सभोवताल असलेल्या विविध गोड पाण्याचे स्रोत मोठ्या प्रमाणात प्रदूषित होऊन पाणी पिण्यायोग्य न राहता धोकादायक बनत चालले आहे. तेथील जलपरिसंस्था व जैवविविधता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

याला पर्याय म्हणून मातीच्या छोट्या मूर्तींचा आग्रह धरणे, गणेशमूर्तीचे घरगुती विसर्जन, औषधयुक्त झाडांचा, पानाफुलांचा संयमित वापर, निर्माल्यापासून खतनिर्मिती, कृत्रिम रंग वगळून नैसर्गिक रंगांचा थोडक्यात वापर या गोष्टींचा आग्रह आपण करायलाच हवा व आपल्या परिसरातील गोड पाण्याच्या स्रोताला प्रदूषित होण्यापासून वाचवायला हवे.

■ प्रा. डॉ. गजानन वाघ
कोषाध्यक्ष, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (डब्ल्यूईसीएस)
सदस्य, अमरावती जिल्हा जैवविविधता संस्था.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव
## नैसर्गिक रंग एक उत्तम पर्याय


डॉ. अंजली देशमुख

२००५ पासून मातीचे गणपती बसवा, निसर्गाशी बांधीलकी दाखवा या घोषवाक्याला ध्येय ठरवून संस्थेची वाटचाल सुरू झाली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाकरिता वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेमार्फत विविध स्तरावर, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोचतील अशा जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. हे उपक्रम फक्त जनजागृतीपुरतेच मर्यादित नसून गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक कसा होईल याकरिता अभ्यास व संशोधनावर आधारित कृती कार्यक्रम राबविण्याचा वसा संस्थेने घेतला.

गणेशमूर्ती रंगविण्याकरिता वापरण्यात येणारे ऑईल पेंट्स व इतर रासायनिक रंग तसेच उधळला जाणारा गुलाल, पूजेकरिता वापरण्यात येणारे रासायनिक कुंकू या सर्वांचा एकत्रित अत्यंत विनाशक असा परिणाम पर्यावरणावर होत आहे.

महिला, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता कागदाचा लगदा (रासायनिक शाईचा वापर न केलेला) व मातीच्या मिश्रणापासून छोटी गणेशमूर्ती तयार करणे; मूर्ती रंगविण्याकरिता सहज उपलब्ध व मुबलक मिळणाऱ्या नैसर्गिक स्रोतांपासून जसे तांदळाचे पीठ, हळद, कात, शेंदरीची फळे, पारिजातकाची फुले व याभळीचा डिंक आदींचा उपयोग करून रंग तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले जाते. शास्त्रातसुद्धा याच रंगांचे महत्त्व सांगितलेले आहे.

येणाऱ्या काळात ऑईल पेंट्स नव्हे, तर जलमिश्रित रंगांचा वापरसुद्धा गणेशमूर्ती रंगविण्याकरिता थांबला पाहिजे, अशी आग्रही भूमिका विविध संस्थांनी जागृती मोहीम, कार्यशाळा व चळवळीच्या माध्यमातून मांडली पाहिजे, तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करता येईल; अन्यथा आपल्या वसुंधरेला प्रदूषणाच्या विळख्यातून वाचविणे आपल्या हातात राहणार नाही.

मूर्ती या पारंपरिक मातीच्याच असाव्या, भाजलेल्या मातीच्या नसाव्यात. मूर्ती रंगविण्याकरिता फक्त नैसर्गिक रंगांचाच वापर करावा. चटकदार, चकचकीत व आकर्षक रंगाच्या गणेशमूर्तींना बळी पडू नका. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे पूजेची मूर्ती ही छोटी असावी; जेणेकरून ती पाण्यात लवकर विरघळेल. मूर्तीचे विसर्जन घरीच करावे; म्हणजे विरघळलेल्या मातीचा उपयोग परत मूर्ती बनविण्याकरिता होईल.

■ प्रा. डॉ. अंजली देशमुख
अध्यक्ष, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव


प्राची पालकर

गणपतीची मूर्ती आपल्या सर्वांच्या देव्हाऱ्यात असतेच. तिची रोज पूजाही केली जाते. भाद्रपदातील गणेशोत्सव जवळ आला की सगळ्यांची लगबग सुरू होते. महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा सण महत्त्वाचा आहे. चतुर्थीला वाजतगाजत गणरायाचे आगमन होते आणि पुढील दहा दिवस बाप्पा घराघरात विराजमान असतात. पूर्वी गणपतीच्या मृण्मयी मूर्तीची स्थापना करायचे व प्रत्येकाच्या घरातील प्रथेप्रमाणे त्या, त्या दिवशी मूर्तीचे विसर्जन करायचे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाज एकत्र यावा, विचारांची देवाणघेवाण व्हावी, समाजप्रबोधन घडून यावे या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक केले. लोक घरात आणि मंडळात दोन्ही ठिकाणी गणेशोत्सव उत्साहात साजरा करू लागले. कालांतराने मूर्ती जास्त भव्य, आकर्षक असावी, असे प्रत्येकाला वाटू लागले. या संघर्षात माती आणि शाडूच्या मूर्तींची जागा केव्हा प्लास्टर ऑफ पॅरिसने घेतली समजलेच नाही. ठिकठिकाणी आकर्षक रासायनिक रंगांनी रंगवलेल्या गणेशमूर्ती तयार होऊ लागल्या. मूर्तीचा आकार व भव्यता वाढत गेली. आता या मूर्ती विसर्जन कुठे करायच्या; तर नदी, तलाव, समुद्र असे मोठमोठे जलसाठे आहेतच. पण, हे नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित होत आहेत, याचे भानही आपल्याला राहिलेले नाही. अमरावती शहरातील तलावांच्या किनाऱ्यावर अनंतचतुर्दशीनंतर गेल्यास या मूर्तींचे भग्नावशेष, नीट विसर्जित न झालेल्या मूर्ती, पाण्यावर तरंगणारा कचरा पाहून कुणाचेही मन विषण्ण होईल, अशी स्थिती होते. याकडे अनेक पर्यावरणप्रेमींचे लक्ष गेले व आज परिस्थिती बरीच आटोक्यात आली. मातीच्या मूर्तींची मागणी वाढते आहे. एक गाव एक गणपती हा उपक्रम राबविला जायला हवा. आपली संस्कृती पर्यावरणपूरक आहे. पर्यायाने आपले उत्सवही पर्यावरणपूरक असावे. उत्सवाचा मूळ उद्देश बाजूला सारून त्याला बिभत्स रूप देणे आपले संस्कार नाहीत. कुठल्याही कार्याला सुरुवात आपण गणपतिपूजनाने करतो. तसेच उत्सव पर्यावरणपूरक असावे, या जनजागृती कार्यालाही सुरुवात याच गणेशोत्सवापासून करू. या वर्षी सर्वांनी मातीच्या मूर्तीचा आग्रह धरावा. नैसर्गिक मखर करावे. थर्माकोल वापरू नये. मंडळांनी खूप मोठ्या मूर्तींचा आग्रह धरू नये. समाजप्रबोधन होईल, असे व संस्कृती पूरक कार्यक्रम करावे. पर्यावरणाचा समतोल ढळू न देणे हे देशाच्या प्रत्येक जाणत्या नागरिकाचे कर्तव्य आहे. चला तर यावर्षी गणेशोत्सव पर्यावरणपूरक करण्याचा संकल्प करूया.

प्राची पालकर
अमरावती.
९८२३०४९११८

## गणेशमूर्ती मातीचीच हवी


डॉ. मंजूषा वाठ

वनस्पती, प्राणी, पक्षी, पर्यावरणातील विविध घटकांचा अभ्यास, संशोधन व संवर्धन याबाबत आवड व जिव्हाळा असणाऱ्या काही स्वाभिमानी लोकांनी एकत्र येऊन उभारलेली चळवळ म्हणजे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था होय. याच संस्थेच्या माध्यमातून अमरावतीत मातीच्या गणपती बसवून निसर्गाशी बांधीलकी ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

संस्थेच्या या उपक्रमाला आता एका तपाचा कालावधी लोटला आहे. जोपर्यंत प्लॅस्टरच्या मूर्ती बंद होणार नाही तोपर्यंत हे अभियान असेच सुरू राहणार आहे. प्लॅस्टरच्या मूर्तींमुळे किती भीषण प्रश्न निर्माण होत आहेत याची कल्पना सामान्यांनी करायला हवी. मूठभर प्लॅस्टर सोडून बघा, तडफडून मासे मरतील. मग आपण गणपतीच्या रूपाने हजारो टन प्लॅस्टर ऑफ पॅरिस त्या जलाशयात टाकतो त्यामुळे जलाशयातील जलचर प्राण्यांची, वनस्पतींची काय अवस्था होत असेल हा विचार करून बघा.

या मूर्ती पाण्यात विरघळत नाहीत, त्यामुळे खऱ्या अर्थाने विसर्जन होतच नाही. भंगलेल्या अवस्थेत तशाच पडून राहतात. विसर्जनानंतरचे त्यांचे विदारक रूप बघवत नाही. कालांतराने जलाशय साफ करताना किंवा पाणी आटल्यानंतर इतस्त्र विखुरलेले, तुटलेल्या मूर्ती बघणे अत्यंत वेदनादायी व अस्वस्थ करणारे वास्तव असते. प्लास्टरचा गाळ पाण्यातील जिवंत झरेही बुजवतो. आज पाण्याचे दुर्भिक्ष बघता आपल्याला जलसाठे प्रदूषित करणे परवडणार आहे काय? हाही विचार करा.

मातीच्या गणेशमूर्ती तयार करणे किचकट व वेळखाऊ काम आहे. प्लॅस्टरच्या मूर्ती त्या तुलनेत लवकर तयार होणाऱ्या, सुबक असतात, त्यामुळे त्यालाच मागणी अधिक असते. मूर्तिकारसुद्धा मागणी अधिक असल्याने प्लॅस्टरच्याच मूर्ती तयार करतात. परंतु संस्थेच्या उपक्रमामुळे मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली असून मातीच्या मूर्तीलासुद्धा आता चांगली मागणी आली आहे. याचाच परिणाम म्हणजे मूर्तिकारांमध्येही अनुकूल वातावरण निर्माण झाले असून अनेक जण मातीच्याच मूर्तीची निर्मिती करू लागले आहेत. एका संस्थेने संपूर्ण शहराची मागणी पूर्ण करणे शक्य नाही. परंतु आम्ही लावलेली जागृतीची ज्योत वणवा बनला सर्वत्र प्रज्वलित झाली. आता अनेक नवीन संस्था उदयास आल्या. अनेक शैक्षणिक संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या, त्यामुळे नव्यानिर्मित पर्यावरण संवर्धनाची संकल्पना राबविण्यास मदत झाली. प्लॅस्टरमुक्त पर्यावरण ही संकल्पना याच संस्थेने सर्वांत आधी मांडली ती रुजविण्यासाठी आटोकाट प्रयत्नसुद्धा सुरू आहेत. समाजाच्या भल्याचा विचार करणारी माणसं एका उदात्त उद्देशाने एकत्र येऊन काम करतात हेच संस्थेच्या यशाचे गमक आहे.

■ डॉ. मंजूषा वाठ
सहसचिव, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती.



## उत्सवांना आले बाजारू स्वरूप


श्रीकांत वऱ्हेकर

सर्व भारतीय सण व समारंभ हे मुळात निसर्ग, पर्यावरण व ऋतू यांच्यातील बदलांना अनुसरूनच केले जातात. हळूहळू या उत्सवांना बाजारू स्वरूप प्राप्त झाले. त्याहून खेदाची बाब म्हणजे या उत्सवांचे निसर्गाशी असलेले नातेच विसरले गेले. मात्र निसर्गातही देव मानणाऱ्या भारतीय संस्कृतीचा आदर करणे आणि तिला समजून घेणे आज गरजेचे झाले आहे.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनात सुख भरभरून असावे आणि दुःखाचा लवलेशही नसावा, असेच वाटत असते. कदाचित त्याचसाठी सुखाचा कर्ता आणि दुःखे घेऊन जाणाऱ्या श्रीगणेशाची स्थापना आपण करतो. पण, आपल्या आनंदात मग्न होऊन अनवधानाने का होईना, आपल्यामुळे कुणाला त्रास होतो का, याचा विचार करणे गरजेचे झाले आहे. आरती वा गाण्यांसाठी आपण मंडळांवर ध्वनिक्षेपक लावतो. बरेचदा त्याचा आवाज मर्यादेपेक्षाही अधिक असतो, त्यामुळे बाजूची म्हातारी माणसं, अभ्यास करणारी मुलं, हॉस्पिटलमधील रुग्ण या सर्वांना त्रास होतो. त्रास किती आणि कसा असू शकतो, याच्याशी मात्र कुणालाच देणेघेणे नसते.

ध्वनिप्रदूषणामुळे माणसावर शारीरिक आणि मानसिक काय परिणाम होतात ते थोडक्यात पाहू. ध्वनिप्रदूषण नियम व नियंत्रण सन २००० अनुसार रहिवासी भागात सकाळी ५५ डेसिबल व रात्रीला ४५ डेसिबल असायला हवा; पण हाच आवाज ७५ डेसिबलपेक्षा जास्त सारखा राहत असेल तर त्याचा शरीरावर परिणाम होतो. जसे की थकवा येणे, गर्भपात होणे, एकाग्रता कमी होणे, रक्तातील सा[illegible] वाढणे, चक्कर येणे, शरीराव[illegible] नियंत्रण कमी होणे, रक्तात[illegible] साखर वाढणे, श्वास घेताना [illegible] होणे, हृदयाचे ठोके वाढणे हे एवढ्यावरच थांबत नाही, तर याचा मानसिकतेवरही परिणाम होतो. जसे की कार्यक्षमता कमी होणे, गोंधळणे, झोपेत व्यत्यय येणे, भावनिक व्यत्यय येणे, स्वभाव आक्रमक होणे, बोलताना अडखळणे इत्यादी. आता खरच विचार करण्यासारखा आहे की आवाज किती मोठा असावा; कारण प्रत्येकाच्या घरात लहान मुले आणि म्हातारी माणसं असतात. आपण तर माणूसच आहोत. घराचे दरवाजे बंद करून जेणेकरून आवाजाचा कुणालाच त्रास होणार नाही. झाडांवर रात्री आश्रयाला असलेल्या पक्षी व प्राण्यांचाही आपण खरच विचार करावा आणि पर्यावरणाचे पर्यायाने निसर्गाचे रक्षण करण्यासाठी हातभार लावावा.

प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर
उपाध्यक्ष, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था अमरावती.

## इको फ्रेण्डली देणगी


किरण मोरे

अलीकडेच सोशल मीडियावर एक फलकाची पोस्ट शेअर होती, त्यात लिहिले होते फक्त इको फ्रेण्डली गणपतीलाच देणगी दिली जाईल. इको फ्रेण्डली म्हणजे काय हे देखील त्यात नमूद होते. गणपती मातीचा असावा, डॉल्बिला सुटी, एखादा सामाजिक उपक्रम व निर्माल्याची योग्य विल्हेवाट असे पॉईंट त्यात नमूद होते. हे वाचून आपल्याकडील मंडळे म्हणतील देणगी चुकविण्याची ही अफलातून कल्पना आहे. परंतु, खरोखरच इको फ्रेण्डली गणपती बसविणे ही काळाची गरज आहे. कारण यातल्या अटी अगदी काळाला पूरकच आहेत. गणपती मातीचाच हवा कारण तो पाण्यात चटकन विरघळतो. रासायनिक रंग नसल्यामुळे पाण्यातील सजीवसृष्टीला हानिकारकही होत नाही. डॉल्बी डीजेचा आवाज कानठळ्या बसविणारा असतो. यामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण होते. जागतिक आरोग्य संस्थेच्या म्हणण्यानुसार ८५ डेसीबल तीव्रतेच्या आवाजात ८ तास घालवले तर कानावर कायमस्वरूपी परिणाम होण्यास सुरुवात होते, असा अभ्यास संशोधकांनी केला आहे. कमी ऐकू येणे, एकाग्रता कमी होणे, थकवा येणे, हृदयाची धडधड आदी लक्षणे कर्णकर्कश आवाजामुळे होतात. इको फ्रेण्डली गणपतीत सामाजिक उपक्रम राबविणे गरजेचे आहे. दहा दिवसांत धार्मिक कार्यक्रमांसोबतच रक्तदान शिबिर, गरजू मुलांना पुस्तकांचे वाटप आदी उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. दहा दिवस गणरायाची पूजा-अर्चना केल्यानंतर माळ, फुले, पूजासाहित्याचे निर्माल्य हे नदी, तलावात गणरायासोबतच विसर्जित केले जाते. यामुळे पाणी प्रदूषण होते. शिवाय तलावात घाण निर्माण होऊन प्राणिमात्रांना धोका निर्माण होतो. निर्माल्याचा वापर सेंद्रिय खत तयार करून घरातीलच बगीचा सुंदर बनविण्यासाठी केला जाऊ शकतो. या अटी पूर्ण करून इको फ्रेण्डली गणपती नक्कीच बसवू शकतो. इको फ्रेण्डली गणपती प्रत्येकच मंडळाने बसवावा, यासाठी प्रत्येकाने इको फ्रेण्डली गणपतीची मागणी मंडळाकडे पावतीच्या वेळी करावी. स्वतः घरी मातीचा गणपती बसवून इको फ्रेण्डलीची संकल्पना साकार करून दाखवावी. वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था गत १५ वर्षांपासून प्रयत्न करीत आहे. मातीच्या गणपतीचा स्टॉल, नैसर्गिक रंग तयार करणे, मातीच्या गणपतीमूर्तींची कार्यशाळा आदी उपक्रम संस्थेच्या वतीने राबवून इकोफ्रेंडलीची संकल्पना घरोघरी पोहोचवण्यात येत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर जनजागृती झाली असून नागरिकही इको फ्रेण्डली गणपतीची मागणी करीत आहे.

किरण मोरे,
वन्यजीव पर्यावरण-संवर्धन संस्था, अमरावती.

## 'वेक्स' विद्यार्थी घडविणारी चळवळ


मनीष ढाकुलकर

गत सात वर्षांपासून वन्यजीव व पर्यावरण संस्थेसोबत पक्षिनिरीक्षण, ट्रेकिंगसारख्या उपक्रमाशी जोडला गेलो. मातीचे गणपती बसवा, निसर्गाशी बांधीलकी दाखवा संस्थेच्या या प्रशंसनीय उपक्रमाबद्दल ओढ निर्माण होऊन स्वयंस्फूर्तीने त्यात सहभागी झाले. मूर्ती कुंभारवाड्यातून आणणे व स्टॉलवर लावणे, लोकांना समजावून सांगणे अशी विविध कामे करताना त्यातून बरेच काही शिकायला मिळाले. संस्थेचा प्रत्येकच पदाधिकारी हा स्वयंसेवकाप्रमाणे काम करतो. विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होत उत्साहाने काम करतात. कमी वयात पर्यावरण संवर्धनाची ओढ विद्यार्थ्यांत निर्माण होण्यास मदत होते. वेळेचे नियोजन, मार्केटिंग, व्यक्तिमत्त्व विकास यांसारख्या स्किल याद्वारे विद्यार्थ्यांना शिकायला मिळतात.

आजची नवीन पिढी उद्याचे उज्ज्वल भविष्य आहे. तेव्हा समाजजागृतीकरिता विद्यार्थी हे उत्तम माध्यम ठरते. वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाला हातभार लावतात. हा वसा असाच पुढे नेण्याचा तरुणांनी संकल्प केला.

विशेष म्हणजे, बहुतांश तरुणांनी आपापल्या गावी असे उपक्रम सुरू केलेले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थी महत्त्वाचा वाटा उचलतात. विद्यार्थी गणेशमूर्ती विसर्जनस्थळी जाऊन जनजागृती करतात. निर्माल्य पाण्यात टाकण्यापासून त्यांना परावृत्त करतात.

स्वच्छ व सुंदर पर्यावरणासाठी नवनवे विद्यार्थी या उपक्रमाशी जोडले जातात. स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवक म्हणून काम करतात. संस्थेचा उद्देश लोकांपर्यंत पोचवतात. या उपक्रमात आजवर पाचशेवर स्वयंसेवक समाजात कार्यरत आहेत. उत्तम माणूस, विचारशील व संवेदनशील व्यक्ती म्हणून घडविण्यात संस्थेचा सिंहाचा वाटा आहे.

■ मनीष ढाकुलकर
स्वयंसेवक व सदस्य, वन्यजीव व पर्यावरणसंवर्धन संस्था (वेक्स).



जागतिक जैवविविधतादिन विशेष

रानवैभवाचे रानवेडे रक्षक...

डॉ. जयंत वडतकर यांचे मत : न्यायालयाची बंदी असूनही सर्रास होतोय वापर

नायलॉन मांजावरील बंदीची जनजागृती गरजेची

बीएनएचएसतर्फे पक्ष्यांचे रिंगिंग

अमरावती : नदीकाठावर असलेला आमनेरचा किल्ला.

आमनेर किल्ल्याचे वैभव परतणार

'वेक्स'तर्फे शनिवारी, रविवारी स्वच्छता मोहीम

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. ८ : आपला वारसा, आपली जबाबदारी या मोहिमेंतर्गत वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेतर्फे (वेक्स) आमनेर किल्ल्यावर ९ व १० जूनला स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. वेक्सच्या या अभिनव उपक्रमामुळे किल्ल्याचे गतवैभव परतणार आहे. आपल्या प्रवाहाने महाराष्ट्र व मध्य प्रदेशाला विभागणारी तापी व मेळघाटातून उगम पावणाऱ्या गडगा या दोन नद्यांच्या संगमावर महाराष्ट्र सीमेवर एक छोटेखानी किल्ला आहे.

आमनेर वा झिल्पी आमनेर या नावाने परिचित सातपुड्यातील सर्वांगांनी दुर्लक्षित हा किल्ला अमरावतीपासून १८० व धारणीपासून १५ किलोमीटर अंतरावर आहे.

'वेक्स'ची उपलब्धी

अमरावती जिल्ह्याच्या पक्षी वैभवामध्ये ५२ पक्षांची भर

वाईल्ड लाईफ अँण्ड एनव्हायर्नमेंट कंझर्वेशन सोसायटीचे यश

५२ पक्षांमधील काही निवडक पक्षी

'सफर दोन ध्रुवांची' या विषयावर व्याख्यान संपन्न

अमरावती, दि.१३ (प्रतिनिधी)

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचा उपक्रम : वेक्स संस्थेचा पुढाकार

'कॉमन बर्ड'वर मॉनिटरिंग

वैभव वायरेकर ● अमरावती

चिमणी, कावळा, भोरीसारख्या 'कॉमन बर्ड'च्या आजपर्यंत नोंदी घेण्यात आल्या नाहीत. मात्र, आता 'कॉमन बर्ड'ची शास्त्रीय पध्दतीने नोंदी घेण्याचा उपक्रम मुंबई येथील बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने हाती घेतला आहे. यामध्ये जिल्ह्यातील कॉमन बर्डच्या नोंदी करण्यासाठी वाईल्डलाईफ अँण्ड एन्व्हायर्नमेंट सोसायटीने पुढाकार घेतला आहे.

पक्ष्यांच्या नोंदी करण्यासाठी ... पक्षीमित्र.

...आला आहे. यासाठी मुंबईच्या बीएनएचएसचे नंदकिशोर दुधे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. समन्वयक व वेक्सचे सचिव जयंत वडतकर यांनी सहभागी पक्षी अभ्यासकांना सामान्य पक्ष्यांच्या प्रजातीबाबत माहिती दिली. प्रत्येक ग्रीडवर २ ते ३ अभ्यासकांनी सामान्य पक्ष्यांच्या नोंदी केल्या आहेत. यावेळी पक्षी अभ्यासक किरण मोरे, गजानन वाघ निनाद अभंग, गौरव कडू, सौरभ जवजाळ, विशाल गवळी, अभिजीत साबळे, शुभम वाघ, प्रथमेश तिवारी, प्रतुल गोगटे, अल्केश ठाकरे आदि ...

इकोफ्रेन्डली गणेशोत्सव साजरा करावा

सकाळ

जिल्ह्यात आढळले ३९२ प्रजातींचे पक्षी

१७ व्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनात पक्षी सूचीचे प्रकाशन

३४ प्रजाती संकटग्रस्त

आफ्रिकेचा 'रफ' पक्षी विदर्भाचा पाहुणा

विभागात झाली पहिल्यांदाच नोंद, अप्पर वर्धा धरणावरील पाणपक्षी गणना

संस्था काय करते?

विदर्भातील पहिलीच नोंद

छत्री तलाव परिसरात पक्षिनिरीक्षण

डॉ. सलीम अली यांच्या जयंतीदिनी 'वेक्स'चे आयोजन

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक डॉ. दिनेशकुमार त्यागी

बहाळे यांच्या ... आलेत. यावेळी ... रवींद्र वानखडे, उपवनसंरक्षक

पुण्यनगरी

# कडाक्याच्या थंडीत व्याघ्र रक्षकांना मिळाला उबदार दिलासा

वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) तर्फे ब्लँकेटचे वाटप



मातीचे गणपती बसवा; निसर्गाशी बांधीलकी दाखवा!

दैनिक अमरावती दर्शन

# मेळघाटात पर्यावरणप्रेमींची निसर्गभ्रमंती

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेचा उपक्रम



# मातीच्या गणेशमूर्ती वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेचा उपक्रम

अमरावती, ता. ८ : गत आठ वर्षांपासून अमरावतीकरांना मातीच्या गणेशमूर्ती उपलब्ध करून देण्याच्या वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या उपक्रमाला दिवसेंदिवस भरभरून प्रतिसाद मिळत आहे. यंदा संस्थेच्या स्टॉलचे उद्घाटन महापालिका आयुक्त अरुण डोंगरे यांच्या हस्ते व माजी महापौर मिलिंद चिमोटे, संजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थित झाले. पहिल्याच दिवशी पर्यावरणप्रेमींनी संस्थेच्या स्टॉलवर गर्दी केली होती.

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनविलेल्या व रासायनिक रंगांनी रंगवलेल्या गणेशमूर्तींचा सर्रास वापर होत आहे. त्यामुळे जलस्रोत प्रदूषित होत आहेत. विसर्जनानंतरही कित्येक दिवस मूर्तींचे भग्नावशेष तेथेच पडून राहतात. संस्थेने या कामी पुढाकार घेऊन सजगता निर्माण करण्यास सुरुवात केली.

मातीच्या मूर्तींचे घरच्याघरी विसर्जन करावे; हळदीपासून तयार केलेले नैसर्गिक कुंकू वापरावे; निर्माल्याचे खत करावे आदी आवाहनही यानिमित्ताने संस्थेच्या वतीने करण्यात आले. या कामासाठी डॉ. जयंत वडतकर, डॉ. अंजली देशमुख, डॉ. मोना चिमोटे, डॉ. मंजूषा वाट, डॉ. गजानन वाट, डॉ. रमेश चोंडेकर, डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, प्राची पालकर, गौरव कडू, आनंद यादव, नील मोहिते, मनीष ढाकुलकर, वेद पत्की, वैभव ठाकरे, अल्केश टाकरे, नंदू दुधे, किरण मोरे, मोहित चिमोटे, निकिता जाणे, अंजली शर्मा, स्नेहल टाले, प्रियांका मानवटकर, शारदा डोंगरे आदींनी सहकार्य केले.

# मेळघाटातील पक्षीसृष्टी





# वेक्सने जोपासला वृक्षसंवर्धनाचा वसा



वृक्ष लागवड अभियानाप्रसंगी शेवग्याच्या झाडांसह वेक्स व श्रीरामकृष्णाच्या वृक्षविज्ञान विभागाचे पदाधिकारी.

# मातीचे गणपती बसवा; निसर्गाशी बांधीलकी दाखवा!

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेचा उपक्रम

प्रदूषण मुक्त गणेशोत्सव व गणेश विसर्जन



अमरावती: नेहरु मैदानातील इको-फ्रेन्डली गणपतीच्या स्टॉलचे संचालक. (छाया-जय स्टुडिओ)

The Hitavada

# Book 'Checklist of birds of Amravati district' released



# रानपिंगळा मेळघाटातच सर्वाधिक अन् सुरक्षिततही



पुण्यनगरी

# टाकाऊ वस्तूंपासून तयार केली चिमण्यांची...

जागतिक चिमणी दिवसानिमित्त वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स)चा उपक्रम





रानपिंगळा प्रकल्पाच्या जनजागृती अभियान अंतर्गत रानपिंगळा फोटो फ्रेम मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक मा. दिनेशकुमार त्यागी यांना भेट देतांना संस्थेचे पदाधिकारी



वन्यजीव छायाचित्रण प्रदर्शनीचे उद्घाटन करतांना प्रसिध्द अभिनेते श्री. भारत गणेशपुरे



संस्थेच्या रानपिंगळा संशोधन प्रकल्पातील अभ्यास चमूची गुजरात मधील वासदा राष्ट्रीय अभयारण्याला भेट



१८ वे विदर्भ पक्षिमित्र संमेलन यवतमाळ येथे सादरीकरण करतांना किरण मोरे



समुद्र किनाऱ्यावरील पक्ष्यांचा अभ्यास करतांना संस्थेचे सदस्य



लार्क या माहितीपटाचे छायाचित्रण करतांना...



नैसगिक रंग प्रदर्शनीचे उद्घाटन करतांना मा. डॉ. सुनील देशमुख




परतवाडा येथील वन्यजीव सप्ताहा मधील सहभाग



गड व किल्ले स्वच्छता अभियान रॅलीचे स्वागत करतांना वेक्सचे पदाधिकारी



वेक्स तर्फे ई-बर्ड कार्यशाळेचे यशस्वी आयोजन




आमनेर किल्ला स्वच्छता अभियान



आमनेर किल्ला स्वच्छता अभियाना दरम्यान संस्थेच्या सदस्यांची
पदमश्री डॉ. रविंद्र कोल्हे यांचेशी भेट



श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांचेशी संस्थेच्या
सामंजस्य कराराच्या दरम्यान संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य डॉ. व्ही.जी. ठाकरे




गावील गड किल्ला पदभ्रमण उपक्रमाचे यशस्वी आयोजन




श्री गुरुदेव प्रिंटर्स अम. 9766656620